# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ८ मे २०२६

किंमत ४ ₹


## आज दहावीचा निकाल

**मुंबई :** दहावीच्या विद्यार्थ्यांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल आज (दि.८) दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर केला जाणार आहे. राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी यासंदर्भात अधिकृत प्रकटन प्रसिद्ध केले असून, पुणे, मुंबई, नागपूरसह नऊ विभागीय मंडळांचा निकाल एकाच वेळी संकेतस्थळांवर उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुणांची पडताळणी ९ मे पासून करता येणार आहे. तसेच, विद्यार्थ्यांना डिजी लॉकरॲपमध्ये डिजिटल गुणपत्रिका संग्रहित करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## दिबांच्या नावाला भाजपचा विरोध

**पनवेल :** नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यावरून राज्य आणि केंद्र शासनाने स्थानिकांना संभ्रमात ठेवल्यानंतर आता स्थानिक भाजपा नेत्यांनीही पनवेल महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीला 'दिबां'च्या नावाला असलेला विरोध दाखवून दिला आहे. दिबांबद्दल असलेली असुया त्यातून व्यक्त झाली आहे. स्थानिक, भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचा भाजपा नेत्यांनी पुन्हा विश्वासघात केल्याचे टीकास्त्र सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी सोडले आहे. कडू यांनी, गेल्या आठवड्यात महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले होते. त्यानंतर आमरण उपोषणाचे शस्त्र उगारताच अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी केलेल्या खुलाशातून पान २ वर

## वेधक

### भूखंडाचे आमिष दाखवून फसवणूक

**उरण :** तालुक्यातील मोकळे भूखंड विकत देण्याचे आमिष दाखवून एका टोळीने १५ गुंतवणूकदारांकडून तब्बल ५७ लाख ३६ हजार रुपये उकळले आहेत. त्यांना प्लॉट अथवा त्यांची रक्कम परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सीबीडी बेलापूर पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी तेजस डाकी व त्याच्या इतर साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे. या प्रकरणातील टोळीने जून २०२२ मध्ये सीबीडी परिसरात मे. लैंडलॉर्डस् रिअलटर्स या कंपनीचे पान २ वर

## महाराष्ट्रात प्रथमच
# महिला करणार मुंडण

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मागील २० ते २५ वर्षांपासून शासन सेवेत कायमच्या प्रतीक्षेत असलेले समग्र शिक्षा अभियानाचे ३ हजारांवर कर्मचारी दि.९ मार्चपासून मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत उपोषण आणि अन्नत्याग आंदोलन करत आहे. त्यात महिला कर्मचाऱ्यांचा देखील समावेश आहे. विशेष म्हणजे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत दिव्यांग विभागातील अर्ध्या कर्मचाऱ्यांना २०२४ मध्ये सेवेत नियमित करण्यात आले. एकाच अभियानातील अर्धे कर्मचारी कायम व सेवाजेष्ठ कर्मचारी कंत्राटी असल्याने राज्यात असंतोषाचे वातावरण आहे. सन २००१ पासून समग्र शिक्षा अभियान सुरू झाले. त्याच वेळी विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण व शिक्षकांना मार्गदर्शन व्हावे यासाठी विषयसाधन व्यक्ती, विशेष शिक्षक, डेटा एंट्री ऑपरेटर, लेखा, एमआयएस कोऑर्डिनेटर, इंजिनिअर, जिल्हा समन्वयक, सहायक कार्यक्रमाधिकारी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विविध पदावर असणारे कर्मचारी अशी पान २ वर



### स्वेच्छा मरणाची परवानगी

सरकारचे लक्ष आपल्या मागणीकडे वेधण्यासाठी कधी स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून मुख्यमंत्री यांचेकडे स्वेच्छा मरणाची परवानगी मागितली. कधी रस्ता रोको, वृक्ष चढाई, थाळीनाद, पुरुषांचे मुंडण आंदोलन तर कधी गाण्यांच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचे काम केले. ५६ दिवसांत अनेक खासदार, आमदार, विविध पक्ष व संघटनाचे नेते आझाद मैदानावर आले. परंतु, मंत्रिमंडळातील एकही मंत्री आझाद मैदानावर फिरकले नाही हे विशेष.

### मुख्यमंत्र्यांकडून फक्त आश्वासन

विरोधी पक्षात असताना भाजपमधील सुधीर मुनगंटीवार, एकनाथ खडसे, विनोद तावडे, देवेंद्र फडणवीस यांनी २००८ पासून समग्र शिक्षा आंदोलनाचे नेतृत्व करत तत्कालीन सरकारवर आसूड ओढले. आमची सत्ता आल्यास पहिल्या कॅबिनेटमध्ये कायम करण्याचे अभिवचन २०१२ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी दिले. २०२५ मध्ये हिवाळी अधिवेशन आंदोलन दरम्यान स्वतः मुख्यमंत्री यांनी कर्मचाऱ्यांचे उपोषण सोडण्यासाठी आश्वासन दिले आहे.

**समग्र शिक्षा आंदोलनाचा ५७ वा दिवस**

**सरकारला प्रतीक्षा आंदोलनकर्त्यांच्या मरणाची**

## वेश्याव्यवसाय अड्ड्यावर
# पोलिसांचा छापा

### तीन पिडीत मुलींची सुटका

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनीतील चांभार्ली परिसरातील एका बिल्डिंगमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाच्या अड्ड्यावर रसायनी पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या ठिकाणचा देहविक्री अड्डा उद्ध्वस्त करुन मुख्य सूत्रधार नीता राहुल गायकवाड (३६) हिला अटक करण्यात आली आहे. तसेच, या ठिकाणाकहून निरोधकांचे बॉक्स आणि ४ हजार रुपयांची रक्कम देखील जप्त करण्यात आले असुन, तीन पीडित मुलींचीही सुटका करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नीता गायकवाड या चांभार्ली परिसरातील एका इमारतीमध्ये भाडेतत्त्वावर राहत होत्या. त्या नोकरी व पैशांचे आमिष दाखवून अल्पवयीन व तरुण मुलींना आपल्या जाळ्यात ओढत होत्या. त्यानंतर त्यांना जबरदस्तीने देहव्यापारात ढकलून त्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा उचलत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. रसायनी पोलिसांनी नियोजनबद्ध छापा टाकून हा प्रकार उघडकीस आणला. या धडक कारवाई दरम्यान पोलिसांनी तीन मुलींची सुटका केली आहे. त्यात २३, २८ आणि १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा पान २ वर

## जेएनपीएतील कंटेनर टर्मिनल्स सेवा सुरळीत

**उरण :** जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी, सीएफएसएआय आणि बीसीबीए यांनी नुकत्याच जारी केलेल्या सूचनांच्या पार्श्वभूमीवर आपल्या कंटेनर टर्मिनल्सच्या कार्यान्वयन स्थितीबद्दल स्पष्टीकरण दिले आहे. जेएनपीए येथील सर्व पाच कंटेनर टर्मिनल्स सुरळीतपणे कार्यरत असून कोणतीही गर्दी किंवा अडथळा नसताना पूर्ण कार्यक्षमतेने सेवा सुरू आहेत. दररोज सरासरी १० ते १२ कंटेनर जहाजे जेएनपीएमध्ये दाखल होत असून, आयात-निर्यात मिळून सुमारे २२,००० टीईयू कंटेनर मालाची हाताळणी केली जात आहे. गेट ऑपरेशन्सदेखील पान २ वर

# तुटपूंजी भरपाई पदरी पडणार

### सरसकट भरपाईचा शासनाचा दिखावा

**। रायगड । प्रमोद जाधव।**

यंदा आंब्याच्या उत्पादनात ९० टक्के घट झाली असून फक्त १० टक्केच उत्पादन शेतकऱ्यांच्या हाती लागले आहे. आंब्यासह काजू उत्पादकांना ३ ते ५ लाख रुपये प्रति हेक्टरी भरपाई मिळावी, अशी मागणी असताना शासनाने प्रति हेक्टरी २२ हजार ५०० रुपये भरपाई देण्याचा निर्णय घेतला आहे. या तुटपुंज्या भरपाईमुळेशेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. सरकारच्या या भूमिकेबाबत समस्त शेतकरी वर्गातून नाराजीचे सुर उमटले आहेत.

कोकणात आंबा पिकाचे क्षेत्र पावणेदोन लाख हेक्टर आहे. रत्नागिरी जिल्ह्यात १ लाख २०



हजार हेक्टर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात ३८ हजार आणि रायगड जिल्ह्यात १६ हजार हेक्टर क्षेत्र आहे. त्यात १३ हजार हेक्टर क्षेत्र उत्पादन क्षम आहे. काजूचे क्षेत्र २ हजार २०० हेक्टर आहे. रायगड जिल्ह्यात श्रीवर्धन, तळा, म्हसळा, रोहा या तालुक्यांमध्ये काजू फळपिक लागवडीचे सर्वात जास्त क्षेत्र आहे. त्यातून आंबा व काजू उत्पादकांना उत्पादनाचे साधन उपलब्ध होते. अनेकांना रोजगाराचे साधन खुले होते. जागतिक हवामान बदलामुळे वातावरणात अमुलाग्र बदल होत आहेत. त्याचा परिणाम कोकणातील आंब्याच्या उत्पादनावर विशेष करून जगप्रसिद्ध असलेल्या हापूस आंब्यावर होत आहे. यावर्षी मात्र आंब्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. वातावरणाच्या बदलाची झळ हापूस आंब्यासह काजूलाही बसली आहे. बदलत्या वातावरणामुळे यावर्षी आंब्याची पान २ वर

## एसटीच्या धडकेत पादचारी जखमी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**


श्रीवर्धन तालुक्यातील बागमंडला येथे मंगळवारी (दि.५) रात्री एसटी बसच्या भीषण अपघातात तीन पादचारी गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली. भरधाव वेगाने धावणाऱ्या बसच्या डिकीचा दरवाजा अचानक उघडल्याने ही धडक बसली. या अपघातामुळे परिसरात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रीवर्धन आगाराची एसटी बस मंगळवारी सायंकाळी सुमारे ७.०० वाजण्याच्या सुमारास बागमंडला मार्गे प्रवाशांना घेऊन जात होती. रात्री पान २ वर

# घारापुरी बेटाच्या विकासाला खीळ

### संसंदीय स्थायी समितीकडे साकडे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

केंद्रीय विकास पंचायत राज संसंदिय स्थायी समितीच्या खासदारांनी मंगळवारी (दि.५) घारापुरी बेट व ऐतिहासिक लेण्यांना भेट दिली. यादरम्यान समितीच्या खासदारांना भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने लादलेले कडक निर्बंध, अटी व शर्तीमुळे ऐतिहासिक एलिफंटा बेट, घारापुरी लेणी आणि विविध शासकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विकास योजनांमध्ये कशा प्रकारे अडथळे निर्माण होतात, त्याची ग्रामपंचायतीच्या माध्यमातून




दिलेल्या निवेदनातुन जंत्रीच मांडली आहे.

घारापुरी बेटावर पर्यटकांचा वाढती संख्या आणि पायाभूत सुविधांची कमतरता लक्षात घेऊन केंद्र सरकारने काही विकास प्रकल्पांना मंजुरी दिली होती. हे प्रकल्प राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आवश्यक पायाभूत सुविधा पुरवण्याच्या दृष्टीने आणि त्यावेळच्या गरजेनुसारच अत्यंत महत्त्वाचे होते. परंतु, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने एलिफंटा बेट, घारापुरी लेणी विकास कामांच्या परवानगीसाठी अनेक जाचक निर्बंध लादले आहेत. कामांच्या मंजुरीसाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडे पाच-पाच वर्षे प्रतिक्षा करावी लागते. पर्यटक व रहिवासी यांना पायाभुत सुविधा निर्माण करण्यासाठी वर्षो नुवर्षे वाट पाहावी लागते. त्यामुळे पर्यटकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम म्हणून देशी विदेशी पान २ वर







# अखेर खांब नाका प्रकाशमय

। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील खांब नाक्यावर सात ते आठ महिन्यांपूर्वी उड्डाण पुलावर पथदिवे बसविण्यात आले. परंतु, त्याचा उजेड काही पडेना, मग खांब नाक्यावर बसविण्यात आलेले पथदिवे फक्त शोसाठी त्याचा प्रकाश केव्हा पडणार अशी बातमी काही दिवसापूर्वी कृषीवल वृत्तपत्रामधून प्रकाशित झाली होती. या बातमीची दखल घेत खांब नाक्यावरील रस्त्याला बसविण्यात आलेले पथदिवे चालु करून खांब




- कृषीवलच्या बातमीचा इफेक्ट
- नागरिकांकडून आभार व्यक्त

नाका प्रकाशमय झाल्यामुळे येथील रहिवासी नागरिकांकडून कृषीवल वृत्तपत्राचे आभार व्यक्त केले आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील खांब नाक्यावर अनेक दिवसांपासून उड्डाण पुलावरील दोन्ही बाजूला पथदिवे बसविण्यात आले आहेत. परंतु त्याचा उजेड काही केल्या पडेना. या उलट उड्डाणपुलामुळे दोन्ही बाजूच्या बायपास रस्त्याला सतत अंधार पसरलेला असतो. तसेच या मार्गावर बनविण्यात आलेले उड्डाण पुलही खाली वर असल्यामुळे येजा करणारी वाहने रात्रीच्या अंधारात दिसत नाही. यामुळे या ठिकाणी अपघात होतांना दिसून येत होते परंतु आता खांब नाका प्रकाशमय झाल्यामुळे असंख्य समस्या मिटणार असल्यामुळे रहिवाशी नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आला.

> खांब परिसरातील असंख्य गावातील नागरिक खांब नाक्यावर रात्री-अपरात्री विविध कामासाठी येजा करीत असतात परंतु खांब नाक्यावरील मुंबई-गोवा हायवेच्या उड्डाण पुलामुळे संपूर्ण बाजारपेठेत अंधार पसरलेला होता याला पर्याय म्हणून सात ते आठ महिन्यांपासून पथदिवे लावण्यात आले होते. परंतु त्याचा प्रकाश काही पडेना या विषयी कृषीवल वृत्तपत्रामधून बातमी प्रकाशित झाली व काही दिवसांनी पथदिवे सुरु करण्यात आले आणि खांब नाका प्रकाशमय झाला यामुळे कृषीवल वृत्तपत्राचे आभार.
> -राकेश महाबळे
> सामाजिक कार्यकर्ते

# मृत्यूच्या दारातून परत

- ५० मिनिटांनंतर हृदय पुन्हा सुरू
- वाशीतील रुग्णालयात डॉक्टरांची धडपड
- ४८ वर्षीय महिलेला नवजीवन

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

वाशीतील न्यूईरा रुग्णालयात डॉक्टरांनी मृत्यूच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या ४८ वर्षीय महिलेचा जीव वाचवत अक्षरशः चमत्कार घडवला आहे. हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन संबंधित महिलेला कार्डिॲक अरेस्ट झाला होता आणि तब्बल ४५ ते ५० मिनिटे तिचे हृदयाचे ठोके पूर्णपणे बंद झाले होते. मात्र, डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांमुळे तिचे हृदय पुन्हा सुरू करण्यात यश आले.

रुग्णालयात दाखल होताच महिलेवर तातडीने ईसीजीसह उपचार सुरू करण्यात आले. सुरुवातीला प्रकृती स्थिर असल्याचे वाटत असतानाच अचानक तिची तब्येत खालावली आणि ती बेशुद्ध पडली. परिस्थिती गंभीर होताच डॉक्टरांनी क्षणाचाही विलंब न करता सीपीआर सुरू केला. त्याचबरोबर व्हेंटिलेटरवर ठेवून आवश्यक ते डीसी शॉक देत हृदय पुन्हा सुरू करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू ठेवले.

सलग ५० मिनिटांच्या झुंजीनंतर अखेर डॉक्टरांना यश आले आणि महिलेचे हृदय पुन्हा ठोके देऊ लागले. त्यानंतर तिला तातडीने कॅथलॅबमध्ये हलवण्यात आले. अँजिओग्राफीदरम्यान हृदयातील रक्तवाहिनीत मोठा अडथळा आढळून आला. डॉक्टरांनी तातडीने अँजिओप्लास्टी करून तो अडथळा दूर केला.

त्यानंतर काही दिवस महिलेला आयसीयूमध्ये ठेवून उपचार करण्यात आले. तिच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत गेली. पुढील काही दिवसांत तिला व्हेंटिलेटरवरून काढण्यात आले आणि सहाव्या दिवशी ती पूर्णपणे स्थिर अवस्थेत घरी परतली.या घटनेबाबत डॉ. गौरव सुराणा यांनी सांगितले की, ''अशा गंभीर परिस्थितीत प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असतो. योग्य वेळी सीपीआर आणि तात्काळ उपचार मिळाल्यामुळेच रुग्णाचा जीव वाचवणे शक्य झाले.'' या घटनेमुळे संबंधित महिलेला अक्षरशः नवजीवन मिळाले असून, वैद्यकीय क्षेत्रातील तत्परतेचे हे एक उल्लेखनीय उदाहरण ठरले आहे.

# मुरूडमध्ये समाधान शिबिराचे आयोजन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

नगरपरिषद स्तरावर सर्वसामान्य जनता व महिला यांचे दैनंदीन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे तसेच महसुल व नगरपालिका प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर शुकवार (दि.८) मे रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मुरुड जंजिरा नगरपरिषद सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबिरात नगरपालिका स्तरावरील जन्म मृत्यू दाखले, असेसमेंट उतारा, रहिवासी दाखले इ. सेवा तसेच महसुल विभागाकडील निवडणूक, संजय गांधी योजना, सातबारा वाटप, रेशनकार्ड व नावात बदल, उत्पन्नाचे व जातीचे दाखले, वय व अधिवास दाखले, आधारकार्ड दुरूस्ती तसचे ॲग्रोस्टॅक योजना, ई-केवायसी इत्यादी सेवा उपलब्ध होणार आहेत. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा फायदा घ्यावा असे आवाहन मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी केले आहे.

## पान १ वरून

## महाराष्ट्रात प्रथमच महिला करणार मुंडण

अनेक पदे सहा-सहा महिन्यांच्या करारावर व मानधन तत्त्वावर भरली गेली होती. गत २० ते २५ वर्षांत प्रत्यक्ष सेवेदरम्यान तब्बल २५७ कर्मचारी विविध कारणांने मृत्यूमुखी पडले आहेत. त्यामुळे देशात लाडक्या बहिणी व महिला आरक्षणाचा मुद्दा चर्चेत असताना प्रगतीशील महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना आपल्या रास्त मागण्यासाठी ५६ दिवस उपोषण व इतर आंदोलन करावे लागत आहे. उन्हाच्या तडाख्यात ५६ दिवसाच्या आंदोलनानंतर सुद्धा एकाही मंत्र्याने दखल घेतली नसल्याने नाईलाजाने कर्मचाऱ्यांनी महिला मुंडण आंदोलनाचा इशारा दिला आहे. दि.७ मेपर्यंत सरकारने नियमित करण्यासंदर्भात ठोस निर्णय न घेतल्यास दि.८ मे रोजी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत सर्व महिला कर्मचारी मुंडण करणार असल्याचे निवेदन शासनास सादर केले आहे.

## वेश्याव्यवसाय अड्ड्यावर पोलिसांचा छापा

समावेश आहे. त्यामुळे या गुन्ह्याचे गांभीर्य अधिक वाढले आहे. या पीडित मुलींना ताब्यात घेऊन त्यांना संरक्षण व समुपदेशनासाठी संबंधित विभागाकडे सुपूर्द करण्यात आल्याचे पोलिसांकडू सांगण्यात आले आहे. याप्रकरणी नीता गायकवाड या महिलेविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ही कारवाई खालापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली पथकाने यशस्वी केली. या कारवाईमुळे रसायनी परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अशा बेकायदेशीर धंद्यांवर पोलिसांनी आणखी कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. या घटनेचा पुढील तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ हे करीत आहेत.

## घारापुरी बेटाच्या विकासाला खीळ

पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. येथील परिसराची देखभाल भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागामार्फत केली जाते. एलिफंटा बेटावर शेतबंदर, राजबंदर आणि मोराबंदर अशी १२०० लोकसंख्या असलेली तीन गावे आहेत. ही गावे कोरीव लेण्यांच्या परिसरापासून सुमारे ३ ते ४ किलोमीटर अंतरावर आहेत. भरतीच्या वेळी एलिफंटा बेटाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १० चौरस किलोमीटर आणि ओहोटीच्या वेळी सुमारे १२ चौरस किलोमीटर असते. परंतु, कोरीव लेण्या बेटाच्या मध्यभागी असल्याने त्या समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे ४ किलोमीटर अंतरावर आहेत. समुद्र किनाऱ्यापासूनचे अंतर लक्षात घेता प्रत्येक विकासकामांसाठी परवानगीची अट घातलेल्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग अशा विकास प्रकल्पांना तातडीने परवानगी देईल, अशी अपेक्षा असते. त्यामुळे देशी विदेशी पर्यटकांना फायदा होईल. तसेच, पूर्णपणे पर्यटन व्यवसायावर अवलंबून असलेल्या गावकरी, छोटेमोठे लघु उद्योजक यांना आर्थिक विकासालाही मदत होईल. परंतु, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडून प्रकल्पांच्या मंजुरीसाठी कायम होणाऱ्या विलंबामुळे प्रकल्प रखडतात आणि प्रकल्पाच्या खर्चातही दुपटीने वाढ होते.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सन २०१५ मध्ये एलिफंटा बेट व पर्यटकांसाठी सुमारे २५१ कोटी रुपये खर्चाची विकास योजना तयार केली होती. परंतु, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने या विकास योजनेला वेळेवर मंजुरी न दिल्यामुळे १० वर्षांपासून विकास रखडला आहे. त्यामुळे पर्यटक, ग्रामस्थ आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांपासून वंचित आहेत. तसेच, ७०० कोटी खर्चाचा महत्त्वाचा शिवडी-एलिफंटा लेणी दरम्यान नियोजित ८ किमी लांबीचा प्रकल्प जवळपास रद्द करण्याची नामुष्कीलीची पाळी शासकीय विभागावर आली.

युनेस्कोद्वारे जागतिक वारसा स्थळ म्हणून प्रमाणित एलिफंटा बेटावरील ग्रामस्थ व ग्रामपंचायतीच्या व्यथा केंद्र सरकारपर्यंत पोहोचवाव्यात. तसेच, बेटाचा विकासाचा मार्ग मोकळा होण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी सरपंच मीना भोईर, उपसरपंच बळीराम ठाकूर यांनी केंद्रीय विकास पंचायत राज संसदिय स्थायी समितीकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## एसटीच्या धडकेत पादचारी जखमी

सुमारे साडेसात वाजता ही बस बागमंडला परिसरातून जात असताना बसच्या बाजूचा डिकीचा दरवाजा अचानक उघडला. त्यावेळी बस भरधाव वेगात असल्याने उघड्या दरवाज्याची जोरदार धडक रस्त्याच्या कडेला चालणाऱ्या तीन पादचाऱ्यांना बसली. या भीषण धडकेत दोन महिला आणि एक पुरुष गंभीर जखमी झाले. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की तिघेही रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. या अपघातानंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली. सुरुवातीला त्यांना बागमंडला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी एसटी प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. बसचा चालक आणि वाहक हे दोघेही मद्यधुंद अवस्थेत असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. तसेच, बसची योग्य तपासणी न करता ती रस्त्यावर धावविण्यात आल्यामुळे हा अपघात घडल्याचा आरोपही करण्यात येत आहे. एसटी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे निष्पाप नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च एसटी महामंडळाने उचलावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अपघातानंतर रुग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी केली होती.

## तुटपूंजी भरपाई पदरी पडणार

मोहर प्रक्रीया थांबली. काही ठिकाणी आलेला मोहर उष्णतेमुळे करपून गेला. ४० टक्केहून अधिक झाडांना मोहरच आला नाही. मोहर संवर्धनासाठी महागडया औषधांचा वापर करून शेतकऱ्यांनी भरमसाठ खर्च केला. मात्र, त्यांच्या पदरी निराशाच पडली. आंबा पिक संकटात सापडला असून यावर्षी फक्त १० टक्केच उत्पादन आल्याची माहिती सर्वेक्षणातून निर्माण झाली असून त्याचा अहवाल शासनाला पाठविण्यात आला.

आंबा व काजू उत्पादनात प्रचंड घट झाल्याने निसर्ग व तौक्ते चक्री वादळाच्या धर्तीवर शेतकऱ्यांना सरसकट भरपाई मिळावी. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५ लाख रुपये व काजू उत्पादक शेतकऱ्यांना ३ लाख रुपये प्रति हेक्टरी नुकसान भरपाई मिळावी, म्हणून महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी शासनाकडे मागणी केली. याबाबत निवेदनही दिले. शासनाकडून समाधानकारक भरपाईची अपेक्षा होती. परंतु, तुटपूंजा निधी जाहीर करून शासनाने आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. प्रति हेक्टरी २२ हजार ५०० रुपये भरपाई दिली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

## भूखंडाचे आमिष दाखवून फसवणूक

कार्यालय सुरू केले होते. त्यानंतर त्यांनी उरण तालुक्यांतील विंधणे, वशेणी व पुनाडे या भागातील मोकळे प्लॉट विकत देण्याची जाहिरातबाजी केली होती. या जाहिरातबाजीला भुलून अनेक गुंतवणूकदारांनी या कंपनीकडे धाव घेतली. आरोपींनी या गुंतवणूकदारांकडून प्लॉटच्या मोबदल्यात मोठी रक्कम घेतली. मात्र, पैसे घेऊनही आरोपींनी प्लॉटचा दिला नाही आणि गुंतवणूकदारांचे पैसेही परत केले नाहीत.त्यामुळे गुंतवणूकदारांची मोठया प्रमाणात फसवणूक झाली. या प्रकरणात फसवणूक झालेल्यांमध्ये पुष्करसिंग रावत यांच्यासह प्रवीण चंदनशिव, प्रदीप भाटकर, सुनील वाडकर, कांतीलाल पटेल, गौरव वरसोलकर, राजिंदर सिंग, हफिज अन्सारी, मनोज होळकर, नानी मंडल, तुकाराम ढेपे, सचिन शहाणे, सुनील शेट्टी व इतरांचा समावेश आहे. या सर्वांना मिळून ५७ लाख ३६ हजार रुपयांचा गंडा घालण्यात आला असून, या १५ गुंतवणूकदारांनी एकत्र येऊन सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आर्थिक फसवणूक करून खोट्या जमीन खरेदी विक्री करणाऱ्या टोळ्या उरण तालुक्यात सक्रिय झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## जेएनपीएतील कंटेनर टर्मिनल्स सेवा सुरळीत

स्थिर असून, दररोज सुमारे २०,००० टीईयू मालाची रस्तेमार्गे तर २,००० टीईयू मालाची रेल्वेमार्गे वाहतूक केली जात आहे.

गर्दीबाबत करण्यात येत असलेल्या दाव्यांच्या विपरीत, बंदरातील कामकाज कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरळीत सुरू आहे. सध्याची अडचण ही बंदर टर्मिनल्समध्ये नसून, कंटेनर फ्रेट स्टेशन (सीएफएस) आणि कस्टम ब्रोकर्स (सीबी) यांच्याकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या ट्रेलर्स आणि चालकांच्या कमतरतेमुळे निर्माण झाली आहे.टर्मिनल यार्डमध्ये ठेवण्यात आलेले आयात कंटेनर्स हे सीएफएस किंवा सीबी यांच्याकडून ट्रेलर्स उपलब्ध करून दिल्यानंतरच वितरित केले जातात. पुरेशा संख्येने ट्रेलर्स उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी आहे. सुट्ट्या किंवा अनुपस्थितीमुळे चालक उपलब्ध नसल्यास, पर्यायी व्यवस्था तातडीने करणे आवश्यक आहे. कंटेनर वितरण प्रक्रिया जलद करण्यासाठी टर्मिनल्सकडून अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. लोडिंगसाठी ट्रेलर्स प्रतीक्षेत असल्याची कोणतीही परिस्थिती नाही. उलट, चालकांच्या कमतरतेमुळे टर्मिनलमध्ये येणाऱ्या ट्रेलर्सची संख्या कमी झाली आहे. जेएनपीएकडून करण्यात येत असलेल्या सक्रिय उपाययोजना करण्यात येत आहे. त्यात रेल्वे सायडिंग असलेल्या जवळील सीएफएस पर्यंत कंटेनर्सची रेल्वेमार्गे जलद वाहतूक सुलभ करणे. मंजुरी प्रक्रियेला गती देण्यासाठी सीमाशुल्क विभागाशी समन्वय साधणे. सध्या सुट्टीवर असलेल्या चालकांना परत आणण्यासाठी पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश येथून विशेष रेल्वे गाड्यांची व्यवस्था करून व्यापार क्षेत्राला सहाय्य करणे, या गोष्टींचा समावेश आहे. जेएनपीए आपल्या ग्राहकांना सर्वोत्तम सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे. टर्मिनल यार्डमधून आयात कंटेनर्सची सुरळीत निकासी सुनिश्चित करण्यासाठी सीएफएस आणि कस्टम ब्रोकर्स यांनी तातडीने पुरेशा संख्येने ट्रेलर्स आणि चालकांची व्यवस्था करावी, असे आम्ही आवाहन करतो. असे जेएनपीए प्रशासनाने एका प्रसिद्धीपत्रका द्वारे सांगितले आहे.

## दिबांच्या नावाला भाजपचा विरोध

लोकनेते दिबांच्या नावाला विरोध करताना मागील सत्ताधाऱ्यांनी 'स्वराज्य' नाव देण्याचा आ. प्रशांत ठाकूर यांच्या शिफारशीवरुन इमारत पूर्ण होण्याआधीच घाईघाईने ठराव करुन घेतला आहे. राज्य सरकारने नवी मुंबई विमानतळाला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा केलेला ठराव रद्द केला. मग प्रशांत ठाकूर महापालिकेने केलेला ठराव दिबांसाठी का रद्द करू शकत नाही, असा जळजळीत प्रश्न कडू यांनी उपस्थित करुन मास्टरस्ट्रोक दिला आहे.


### पनवेल महानगपालिका
### पर्यावरण विभाग

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा' अंतर्गत मिशन ५० सोसायटी पर्यावरण साक्षरता मोहिम राबवणेसाठी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेसाठी आर्थिक खर्चांचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून जाहीर सूचनेद्वारे बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/पर्या./३४२६/प्र.क्र.०१/२४/२०२६
दिनांक :०६/०५/२०२६

सही/-
उपायुक्त (पर्यावरण)
पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे लाखोले, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनांच्या मिळकती असुन सदर मिळकतींचे विद्यमान मालक/कब्जेदारांपैकी १. श्री. सुरेश बळीराम म्हात्रे आणि २. श्री. चंद्रकांत बळीराम म्हात्रे यांच्या निम्म्या हिस्स्याच्या क्षेत्राची मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

जमिन मिळकतींचे वर्णन
मौजे - लाखोले, ता. पेण, जि. रायगड येथील

| मालक/ कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्रीधर विठ्ठल म्हात्रे<br>सुरेश बळीराम म्हात्रे<br>चंद्रकांत बळीराम म्हात्रे | ३४९ | - | ०-१०.६०<br>पैकी ०-०५.३० | १.६२ |
| | ३५४ | - | ०-२८.४०<br>पैकी ०-१४.२० | ४.१४ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १. श्री.सुरेश बळीराम म्हात्रे आणि २. श्री.चंद्रकांत बळीराम म्हात्रे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ०८/०५/२०२६.

श्री. तुषार द.देवरे, ॲडव्होकेट
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची वाणिज्य गाळा मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. २ हिस्सा नं. ४ या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या शिवनेरी को.ऑप हौस. सोसायटी या इमारती मधील वाणिज्य गाळा मिळकत क्र. ६ क्षेत्र २५० चौ. फुट (ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. १०९८/१०) सदर नोटीसीचा विषय आहे.**

सदर नोटीसीचा विषय असलेली वाणिज्य गाळा मिळकत हि विद्यमान मालक श्री. रमेश लक्ष्मण भिलारे, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०७/०५/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

### जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-०२-६० शेत जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणारी घर मिळकत श्री. बाळू रतन पांढरे, राहणार वायशेत, अलिबाग, यांच्या मालकीची असून, सदरील शेत जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणाऱ्या घर मिळकतीसह सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर शेत जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| बामणोली ता. अलिबाग. | ७० | ०-२१-८०<br>०-०१-५० पो.ख.<br>०-२३-३० एकूण | ०१-२४ |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी श्री. बाळू रतन पांढरे यांच्या मालकीच्या ०-०२-६० (हे. आर शेतजमिन मिळकत व त्याअंतर्गत असणारी ग्रुप ग्रामपंचायत मान तर्फे झिराड कडील घर क्रमांक ३२३, क्षेत्र ७२.७७ चौरस मीटर (७८३ चौ. फूट) क्षेत्रफळाची घर मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ०७/०५/२०२६.

सही/-
(ॲड. प्रमोद मधुकर पांडव)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

माझे आशिल श्री.अशोक दत्तू गावंड, मु.कोळगांव, पो.सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येते ती खालील प्रमाणे.

(०१) मौजे कोळगांव, ता.अलिबाग, जि. रायगड व ग्रामपंचायत सासवणे हद्दीतील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत..

| गट क्रमांक | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| २८८ | - | ०.१७.२० | ४.१९ |
| ३०२ | - | ०.१३.०० | ३.१९ |
| ४६४ | १ | ०.७७.१० | ४.७३ |

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत या नोटीशीचा विषय असून त्यास यापुढे ''सदरहू मिळकत'' म्हणून संबोधण्यात येत आहे.

०२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत माझे आशिल यांचे पुर्वगामी माणिक दादु म्हात्रे यांचे मालकीची होती. माणक्या दादु म्हात्रे यांस रूक्मिणी म्हात्रे हि पत्नी व सुभद्रा गावंड हि मुलगी असे वारस आहेत. माणक्या म्हात्रे याचे पश्चात रूक्मिणी म्हात्रे हि पत्नी व सुभद्रा गावंड यांजकडे वारसा हक्काने आली. सदरहू मिळकत रूक्मिणीबाई माणक्या म्हात्रे यांचे एकट्याचे मालकीची केव्हाही नव्हती व नाही. माझे आशिल हे सुभद्रा उर्फ माताबाई रामचंद्र गावंड हिचे वारस आहेत. धर्मा रामचंद्र गावंड याने सदरहू मिळकतीस स्वतःचे नाव बेकायदेशीरपणे नोंदवून घेतले. धर्मा रामचंद्र गावंड हा मयत झाला असुन त्याचे वारस सुनंदा धर्मा गावंड, दिलीप धर्मा गावंड, राजेंद्र धर्मा गावंड, उज्वला एकनाथ पाटील, दिपिका दयानंद म्हात्रे व दिपिका दयाराम म्हात्रे यांनी सदरहु मिळकतीस बेकायदेशीरपणे त्यांची नावे नोंदविली आहेत. आता धर्मा रामचंद्र गावंड याचे वारस सुनंदा धर्मा गावंड, वगैरे हे सदरहू मिळकत त्रयस्तांना विकण्याचे प्रयत्नात आहे. त्यास माझे आशिल यांची हरकत आहे. वर नमुद्र मिळकतीपैकी अनुक्रमांक १ व २ कडील मिळकती बाबत मा. जिल्हा न्यायालय, अलिबाग येथे दिवाणी चौकशी अर्ज क्र. १५/२०२३ नुसार प्रकरण प्रलंबित आहे. धर्मा रामचंद्र गावंड याचे वारस सुनंदा धर्मा गावंड, वगैरे यांस सदरहू मिळकतीची विक्री करण्याचा कोणताही हक्क हितसंबंध नव्हता व नाही.

०३) तरी, या जाहीर नोटीशीने सर्व लोकांस कळविण्यात येते की, धर्मा रामचंद्र गावंड याचे वारस सुनंदा धर्मा गावंड, दिलीप धर्मा गावंड, राजेंद्र धर्मा गावंड, उज्वला एकनाथ पाटील, दिपिका दयानंद म्हात्रे व दिपिका दयाराम म्हात्रे सर्व मु. कोळगांव, पो.सासवणे, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेशी वर नमुद मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठरवू नये. त्यास माझे आशिल यांची सक्त हरकत आहे, याची नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग
तारीख ०५.०५.२०२६

(ॲड. व्हि.जी. तळेकर)
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

### नावात बदल

माझे पूवीचे नाव Ajaj Mohamad Shfie Chogle असे होते. प्रतिज्ञापत्राद्धारे नावात दुरूस्त केल्यानंतर माझे नाव Ajaz Mohamad Shafi Chogle याप्रमाणे असणार आहे. प्रतिज्ञापत्र नं. ३४६/२०२६ दि. १७/०४/२०२६

दिनांक : ०८/०५/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी जमिनीचे विद्यमान मालक विष्णु गणपत पाटील, रा. मु.पो. धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांना मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याची आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग/सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| धोकवडे ता.अलिबाग | ७७६/१० | ०-१७-०० | २.७६ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क, कुळअखत्यारपत्र आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचा मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत/तक्रार आमचे अशिल यांच्यावर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

ॲड. रश्मी संतोष पांडव
रा. श्रीपंतकृपा, मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९७६७९४०९१२

### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **वधू पाहिजे-** केंद्रीय सरकारी अधिकारी वय ४० ते ५०, निमगोरी शिक्षण-ग्रज्युकेशन , जात -हिंदु. उत्पन्न- २०००००० वार्षिक, फोन - ७३८५६६४०७९.
- **पोयनाड एस.टी.स्टँड शेजारी** महावीर सोसायटी मधील दुकान अंदाजे १७०० फूट व त्यावरील फ्लॅट ९०० फूट भाड्याने देणे आहे. बँकेस प्राधान्य मनिष- ८८३०९३०३१६
- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये ऑफिस** कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे. १०/१२ वी ९५२७०२९५०२
- **अलिबागमध्ये दुकान गाळा विक्री करणे आहे.** लोनची व्यवस्था करून मिळेल. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


gandhar® group
With Best Compliments
Keshasvi™
Keshasvi INTENSE NOURISHING HAIR OIL
100ml
Keshasvi HAIR OIL JASMINE
Add a Beautiful Shine
Leaves Hair Smelling Fantastic
Great Finishing Touch
Net Vol. 200 ml
WellPure™
WellPure HYDRABOOST FACE PACK
With Liquorice Extract
WellPure HYDRATING & TONING BODY LOTION
With Papaya Extract
WellPure SUN PROTECTION
SPF 50 PA+++
WellPure MOISTURE BALANCE CLEANSING MILK
With Cucumber Extract
WellPure HYDRABOOST FACE SCRUB
With Cucumber & Tea tree oil
WellPure Extra Firming Night Cream
WellPure Skin Radiance Cream
WellPure Intense Moisture Cream
TQRCG

## तमिळी त्रिशंकूचे लाभार्थी

तमिळनाडूमध्ये अभिनेता विजय यांच्या टीव्हीके पक्षाला पूर्ण बहुमत न मिळाल्याने घोडेबाजार होण्याची भीती निर्माण झाली आहे. राज्यात भाजपला केवळ एक जागा मिळालेली असल्याने त्याचा या बाजारात निदान उघड तरी फार हस्तक्षेप नसेल. पण एका अर्थाने हीच स्थिती धोकादायक आहे. कारण, भाजप पडद्याआडून काहीही कारस्थाने करू शकतो. केंद्रातील सत्तेचा, पोलिसांचा व इडीसारख्या यंत्रणांच्या वापराचा धाक दाखवू शकतो. असे प्रकार देशभरातील अनेक राज्यांमध्ये यापूर्वी झालेले आहेत. मध्य प्रदेशात याच रीतीने सत्तारुढ काँग्रेसमध्ये फूट घडवून आणण्यात आली. झारखंडमध्ये व नंतर दिल्लीमध्ये मुख्यमंत्र्यांनाच उचलून तुरुंगात टाकले गेले. तमिळनाडूमध्ये ते याच रीतीने होऊ शकणार नाही. कारण, टीव्हीकेच्या बाजूने अनपेक्षित असा झंझावात निर्माण होऊन ते पहिल्याच निवडणुकीत सत्तेच्या जवळ गेले आहेत. त्यांचा पक्ष फोडणे किंवा त्यांना अपशकुन करणे भाजपला सहजी शक्य होणार नाही. पण त्यांच्यावर दबाव ठेवणे आणि राज्यपालांमार्फत त्यांना रोखण्याचा प्रयत्न करणे हे शक्य आहे. विजय यांनी बुधवारी राज्यपालांना सरकार स्थापनेचे पत्र सादर केल्यानंतर त्यांनी बहुमताच्या आकड्याचा पुरावा मागितला. त्यांचे ते करणे तांत्रिक दृष्ट्या योग्यच आहे. विजय यांनीदेखील सत्तेसाठी घाई न करता आधी आपल्यामागे बहुमताची जमवाजमव करायला हवी होती. मात्र सरकारचे बहुमत हे विधानसभेमध्ये सिद्ध केले जात असते. निवडणुकांनंतर सर्वात मोठा पक्ष असलेल्या राजकीय गटाला सरकार स्थापनेचे निमंत्रण दिले गेल्याची अनेक उदाहरणे भूतकाळात घडलेली आहेत. विजय यांची या पूर्वीच्या दाखल्यांवरच भिस्त असावी. त्यामुळेच त्यांनी राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांची दोन दिवसात दोनदा भेट घेतली. पण राज्यपालांनी सरकार स्थापनेचे निमंत्रण नाकारल्यानंतर तणाव वाढू लागला आहे. गुरुवारी टीव्हीके कार्यकर्त्यांनी लोकभवनबाहेर निदर्शने केली. अशी अशांत व अस्थिर स्थिती निर्माण होणे केंद्राच्या व भाजपच्या फायद्याचे ठरू शकते. या संदर्भात तामिळनाडू काँग्रेस कमिटीने गुरुवारी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्यावर टीका करताना म्हटले की, सरकारे लोकभवनच्या हिरवळीवर नाही तर विधानसभेच्या पटलावर ठरविली जातात. टीव्हीकेच्या योजनेनुसार, विजय आणि त्यांचे तीन-चार वरिष्ठ सहकारी झटपट शपथ घेणार होते आणि त्यानंतर विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यासाठी दोन आठवड्यांचा वेळ मागणार होते. एकदा सरकार स्थापन झाल्यावर इतर पक्ष आपोआप मागे येतील असा त्यांचा होरा असावा.

### साप-मुंगुसाचे घरटे

टीव्हीकेला बहुमताचा ११८ चा आकडा गाठण्यासाठी अजूनही किमान सहा ते सात जागा कमी आहेत. पण ते ज्या पक्षांवर भिस्त ठेवून आहेत ते विचारसरणीला मानणारे आहेत. मार्क्सवादी कम्युनिस्ट, भारतीय कम्युनिस्ट तसेच दलितांचा व्हीसीके हे पक्ष अत्यंत कडवे विचारनिष्ठ मानले जातात. आजवर ते द्रमुकसोबत होते. ते एकाएकी आपली टोपी फिरवू शकत नाहीत. या स्थितीत आता द्रमुक व अण्णा द्रमुक यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन करावे असा बूट निघाला आहे. हे म्हणजे साप आणि मुंगुसाने एकत्र येऊन घरटे करण्यासारखे आहे. आजवर राज्यात हे पक्ष सदैव एकमेकांविरुध्द लढले व आलटून पालटून सत्तेत आले. आता ते एकत्र सत्तेत आले तर विचारसरणी, वैचारिक विरोध नावाची काही गोष्ट असते यावरचा लोकांचा विश्वास उडून जाईल. देशात इतरत्र असे घडले आहे. महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांपासून हेच राजकारण चालू आहे. कोण कोणासोबत जाईल व कोणत्या आघाड्या आकाराला येतील याला काही धरबंदच राहिलेला नाही. आता तमिळनाडूत हे घडले की भाजपचा शिरकाव होणे अधिक सोपे जाईल. अद्रमुक हा भाजपचा साथीदार आहे. द्रमुक यापूर्वी एकदा भाजपसोबत गेलेला आहे. आता विजय यांना शह देण्यासाठी या दोघांना एकत्र आणायचे आणि त्यांच्या सरकारला केंद्राने हवी ती मदत द्यायची असे सुरु झाले तर नवल वाटायला नको. हे लगेच व आज-उद्याच घडेल असे नव्हे. पण विजय यांना बहुमत मिळाले तरी ते काठावरचे असेल. हे लक्षात घेता भविष्यात हा उपद्व्याप केला जाऊ शकतो व त्यातून महाराष्ट्रात भाजपने आपली स्थिती बळकट केली तसेच तेथेही घडू शकते.

### विजय यांची कसोटी

विजय हे राजकारणात अत्यंत नवखे आहेत. त्यांना राजकारणाचा व कारभाराचा कसलाही अनुभव नाही. त्यातच त्यांनी मतदारांना भरमसाठ आश्वासने देऊन ठेवली आहेत. कुटुंबातील महिला प्रमुखाला दरमहा २,५०० रुपये, प्रत्येक कुटुंबाला वर्षाला ६ मोफत गॅस सिलिंडर, गरीब कुटुंबातील वधूसाठी लग्नामध्ये ८ ग्रॅम (एक तोळा) सोन्याचे नाणे आणि एक रेशमी साडी, सरकारी शाळेत शिकणाऱ्या मुलींच्या मातांना दरवर्षी १५,००० रुपये शैक्षणिक मदत, बेरोजगार पदवीधरांना दरमहा ४,००० रुपये, तर पदविका (डिप्लोमा) धारकांना २,५०० रुपये भत्ता, पाच लाख नवे रोजगार, ५ एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण तर त्याहून वरच्यांचे ५० टक्के कर्ज माफ, पोलिसांचे मूळ वेतन १८,००० वरून २५,००० रुपये केले जाईल आणि १,००० रुपये 'स्ट्रेस अलाउन्स' इत्यादींचा यामध्ये समावेश आहे. ही आश्वासने पूर्ण करायची झाली तर राज्य सरकारला किमान एक लाख कोटींची तरतूद करावी लागेल. पाच वर्षांमध्ये सुमारे साडेचार ते पाच लाख कोटी लागतील. तमिळनाडू सरकारचे करांपासूनचे उत्पन्न गेल्या वर्षी दोन लाख होते. त्याच्या निम्मी रक्कम या आश्वासनांची पूर्तता करण्यातच गेली तर राज्याची स्थिती बिकट होईल. विजय यांनी आपल्या प्रचारातून तरुणांच्या अपेक्षा इतक्या वाढवून ठेवल्या आहेत की त्यांना आता माघार घेणे शक्य होणार नाही. ही आश्वासने पूर्ण करण्यात विजय सरकार का-कू करीत आहे असे लक्षात आले तर असंतोष निर्माण होऊ शकतो. ही स्थितीदेखील भाजपसारख्या पक्षासाठी फायदेशीर ठरू शकते. द्रमुक व अण्णा द्रमुक यांच्या राजकारणाला जनता तूर्त कंटाळली आहे हे उघड आहे. वास्तविक द्रमुकचे सरकारही लोकांवर भरपूर सवलतींचा वर्षाव करीत होतेच. शिवाय बंगालप्रमाणे तिथे भ्रष्टाचार किंवा गुंडगिरी याबाबतच्या तक्रारी नव्हत्या. तरीही द्रमुक पराभूत झाला. हा विजय यांच्यासाठी धडा आहे. त्यांनी आजवर तरी भाजपसोबत जाणार नाही अशी भूमिका घेतली आहे. मात्र एकाच वेळी ते पेरियार या तमिळनाडूच्या महात्मा फुल्यांच्या वारसाचे नाव घेतात तसेच कामराज या काँग्रेसी मुख्यमंत्र्यांचेही स्मरण करत असतात. त्यामुळे एका अर्थाने ते सबगोलंकारी विचार मांडत आहेत. शिवाय त्यांच्या पक्षाची उभारणी आंदोलने किंवा वैचारिक घुसळणीतून झालेली नाही. विजय यांच्या सिनेमाच्या पडद्यावरील प्रतिमेच्या प्रेमातून एकत्र झालेले लोक हे म्हणजेच त्यांचा पक्ष आहे. एकूण राज्याप्रमाणेच विजय यांच्या पक्षाचीही अवस्था त्रिशंकू आहे. या त्रिशंकू अवस्थेचा लाभ दीर्घ काळात कोण व कसा उठवते याकडे लक्ष ठेवावे लागेल.

## विचार | इथेनॉलमिश्रीत पेट्रोलच्या धोरणात हवी विश्वासार्हता

***इथेनॉल धोरणाचे यश हे केवळ उद्दिष्टांवर नाही, तर अंमलबजावणीच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे. सरकारने उद्योग, शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील समतोल साधत विश्वासार्ह आणि स्थिर धोरण राबवले, तरच ऊर्जा स्वावलंबनाचे स्वप्न साकार होईल. अन्यथा, चांगल्या उद्देशाने सुरू केलेली योजना अंमलबजावणीतील त्रुटींमुळे अडखळत राहील आणि त्याची किंमत उद्योग आणि अर्थव्यवस्थेला मोजावी लागेल.***




**प्रा. अशोक ढगे**

वाढत्या जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर आणि आखाती देशांमधील संघर्षामुळे भारताच्या इंधन सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने पर्यायी इंधनांच्या शोधाला गती देत ८५ टक्के इथेनॉलमिश्रीत इंधन (ई ८५) वापरण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पर्यावरणीय नव्हे, तर आर्थिक आणि सामरिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजांपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. यातील मोठा हिस्सा आखाती देशांकडून येतो. या प्रदेशातील राजकीय अस्थिरता, युद्धजन्य परिस्थिती किंवा पुरवठा साखळीतील अडथळे भारतासाठी धोकादायक ठरू शकतात. तेलाच्या किमतीतील चढ-उतार देशाच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम करतात. महागाई वाढते, चालू खात्यातील तूट वाढते आणि रुपयावर दबाव येतो. गेल्या काही वर्षांमध्ये आखाती प्रदेशात निर्माण झालेल्या संघर्षांनी भारतासारख्या आयातदार देशांना धक्का दिला आहे. पुरवठा अनिश्चित झाला, विमा खर्च वाढला आणि कच्च्या तेलाच्या किंमतींनी उसळी घेतली. याचा थेट परिणाम इंधन दरवाढीतून सर्वसामान्यांवर झाला. औद्योगिक उत्पादन खर्च वाढल्याने स्पर्धात्मकतेवरही परिणाम झाला. या पार्श्वभूमीवर भारताने जैवइंधनांकडे, विशेषतः इथेनॉलकडे वळण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. साखर, ऊस, मका आणि इतर कृषी अवशेषांपासून तयार होणारे इथेनॉल देशातच उपलब्ध असल्याने आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होऊ शकते. मात्र ई २० अर्थात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असतानाच ई ८५ सारख्या उच्च मिश्रणाचा निर्णय हे महत्त्वाकांक्षी पाऊल आहे.

ई ८५ इंधनामुळे कच्च्या तेलाची आयात कमी होईल. शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे स्रोत मिळतील. कार्बन उत्सर्जनात घट होईल आणि ऊर्जासुरक्षेला बळकटी मिळेल. तथापि, हा प्रवास सोपा नाही. सध्या देशातील इथेनॉल (ई ८५) उत्पादन मोठ्या प्रमाणावर वापरासाठी अपुरे आहे. ऊस आणि मका यांच्यावर जास्त अवलंबित्वामुळे अन्नसुरक्षेचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. इथेनॉल साठवण, वाहतूक आणि वितरणासाठी स्वतंत्र पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. सर्व वाहने ई ८५ सुसंगत नाहीत आणि इंजिनमध्ये बदल आवश्यक आहेत. इथेनॉलची किंमत, अनुदाने आणि कर धोरण यांचा समतोल साधणेही आवश्यक आहे. वाहन उद्योग या परिवर्तनाचा केंद्रबिंदू आहे. ई ८५ सुसंगत (फ्लेक्स-फ्युएल) इंजिन विकसित करणे, त्यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे आणि ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देणे ही मोठी जबाबदारी कंपन्यांवर आहे. काही कंपन्यांनी या दिशेने पावले उचलली असली, तरी संपूर्ण उद्योगाने एकत्रितपणे पुढाकार घेणे तसेच ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. सरकारने धोरणात्मक स्पष्टता, आर्थिक प्रोत्साहने आणि दीर्घकालीन रोडमॅप देणे आवश्यक आहे. कृषी, ऊर्जा आणि उद्योग या तिन्ही क्षेत्रांमध्ये समन्वय साधल्याशिवाय हा प्रकल्प यशस्वी होणार नाही. त्यावेळी पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांचाही विचार करावा लागेल. भारतासाठी ऊर्जा स्वावलंबन ही केवळ आर्थिक गरज नाही, तर राष्ट्रीय सुरक्षेची बाब आहे. ई ८५ इंधनाचा निर्णय हा योग्य दिशेने टाकलेले पाऊल असले, तरी त्याची अंमलबजावणी शाश्वत आणि सर्वसमावेशक पद्धतीने करणे अत्यावश्यक आहे.

परावलंबित्वातून स्वावलंबनाकडे जाणाऱ्या या प्रवासात अनेक अडथळे येतील; पण योग्य धोरण, तंत्रज्ञान आणि सहकार्य यांच्या जोरावर भारत हा बदल साध्य करू शकतो. ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न आज केवळ अर्थकारणापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर पर्यावरण, परराष्ट्र धोरण आणि तंत्रज्ञान यांच्याशी थेट जोडला गेला आहे. या संदर्भात इथेनॉलमिश्रीत इंधनाबाबत भारतात नव्याने सुरू झालेली चर्चा महत्त्वाची आहे. ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने भारताने इथेनॉलमिश्रीत इंधनाचा स्वीकार केला, हा निर्णय धोरणात्मकदृष्ट्या योग्यच म्हणावा लागेल; परंतु कोणतेही धोरण केवळ कागदावर प्रभावी दिसणे पुरेसे नसते, तर त्याची अंमलबजावणी तितकीच काटेकोर, सुसंगत आणि विश्वासार्ह असावी लागते. दुर्दैवाने, इथेनॉल धोरणाच्या अंमलबजावणीत सरकारच्या विसंगत भूमिकेमुळे साखर कारखाने आणि इथेनॉल उत्पादक अडचणीत सापडल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी ज्या धोरणाने ऊर्जा सुरक्षेला बळकटी द्यायची होती, त्याच धोरणाने उद्योगक्षेत्रात अनिश्चिततेचे सावट निर्माण केले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये सरकारने इथेनॉल उत्पादनाला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले. साखर कारखान्यांना कर्जसवलती, अनुदाने आणि उत्पादन वाढवण्यासाठी विविध योजना जाहीर करण्यात आल्या. या प्रोत्साहनामुळे अनेक कारखान्यांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून इथेनॉल उत्पादन क्षमता वाढवली. काहींनी तर साखरेच्या पारंपरिक व्यवसायातून वळून इथेनॉलकडे अधिक लक्ष केंद्रित केले. सरकारच्या धोरणांवर विश्वास ठेवून उद्योगाने उचललेली ही पावले आता त्यांच्याच अडचणीचे कारण ठरत आहेत. आज मुख्य समस्या उभी राहिली आहे ती इथेनॉल उचलण्याच्या दिरंगाईमुळे. तेल विपणन कंपन्यांकडून वेळेवर आणि नियोजित प्रमाणात इथेनॉलची खरेदी होत नसल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. करार करूनही प्रत्यक्षात उचल न झाल्याने कारखान्यांच्या साठवण क्षमतेवर ताण आला आहे. उत्पादन झालेले इथेनॉल गोदामात पडून राहते. परिणामी, रोख प्रवाहावर परिणाम होतो. कर्जाचे हप्ते, व्याज, कामगारांचे वेतन या सर्व जबाबदाऱ्या पेलताना कारखाने आर्थिकदृष्ट्या कोलमडण्याच्या स्थितीत पोहोचतात. यातच भर पडली ती इथेनॉलच्या दरांच्या प्रश्नाची. उत्पादन खर्च वाढत असताना, विशेषतः कच्चा माल, वीज, वाहतूक आणि मजुरी यांचे दर वाढत असताना, इथेनॉलचे खरेदी दर तुलनेने कमीच राहिले आहेत. सरकार दर निश्चित करते; परंतु ते वास्तव उत्पादन खर्चाशी सुसंगत नाहीत, अशी उद्योगाची तक्रार आहे. यामुळे नफ्याऐवजी तोट्याची परिस्थिती निर्माण होते. दीर्घकालीन दृष्टीने पाहता अशी परिस्थिती उद्योगाला या क्षेत्रातून बाहेर पडण्यास भाग पाडू शकते. सरकार आता ऊस नियंत्रण कायद्यात बदल करण्याच्या तयारीत आहे, ही बाबही तितकीच महत्त्वाची आहे. ऊस दर ठरवण्याची पद्धत बदलून इथेनॉल उत्पादन खर्चाशी जोडण्याचा विचार मांडला जात आहे. वरकरणी पाहता हे पाऊल तर्कसंगत वाटते. कारण इथेनॉल उत्पादन वाढवायचे असेल, तर कच्च्या मालाच्या किंमती त्यानुसार ठरवणे आवश्यक आहे; परंतु या प्रक्रियेत शेतकरी, कारखानदार आणि ग्राहक या तिन्ही घटकांचा समतोल राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कच्च्या मालाचा दर इथेनॉलच्या उत्पादनखर्चावर आधारित असल्यास शेतकऱ्यांना अधिक दर मिळू शकतो; परंतु त्याचा परिणाम इथेनॉलच्या अंतिम किमतीवर होऊन सरकारला अनुदानाचा बोजा वाढवावा लागू शकतो. दुसरीकडे, कारखानदारांसाठीही ही दोन्ही बाजूंनी कात्री ठरू शकते. कच्चा माल महाग आणि तयार उत्पादनाला कमी दर. त्यामुळे या सूत्राचा अवलंब करताना अत्यंत बारकाईने आणि सर्व पक्षांचा विचार करून निर्णय घ्यावा लागेल. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात मोठा प्रश्न आहे तो विश्वासार्हतेचा. उद्योगाने सरकारच्या आवाहनावर विश्वास ठेवून गुंतवणूक केली; परंतु धोरणातील सातत्याचा अभाव आणि अंमलबजावणीतील ढिलाई यामुळे त्यांचा विश्वास डळमळीत झाला आहे. धोरणे वारंवार बदलल्यास उद्योग दीर्घकालीन गुंतवणुकीपासून दूर राहतो. ऊर्जा सुरक्षेसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात अशी अनिश्चितता परवडणारी नाही. यावर उपाय म्हणजे सर्वप्रथम इथेनॉल खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणि कालबद्धता आणणे आवश्यक आहे. तेल कंपन्यांनी केलेल्या करारांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक केले पाहिजे. दुसरे म्हणजे इथेनॉलच्या दरनिर्धारणासाठी एक स्वतंत्र, तज्ज्ञ समिती स्थापन करून उत्पादन खर्चाशी निगडित वास्तववादी दर ठरवू शकते. तिसरे म्हणजे, साठवण आणि वितरणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात सरकारने सक्रिय भूमिका घ्यावी. तसेच ऊस आणि इतर कच्च्या मालाच्या वापरात विविधता आणणेही आवश्यक आहे. केवळ ऊसावर अवलंबून राहिल्यास पाणीटंचाई आणि पर्यावरणीय प्रश्न निर्माण होऊ शकतात. मका, तांदूळ, कृषी अवशेष यांचा वापर वाढवणे हा देखील एक पर्याय असू शकतो. यामुळे उत्पादनखर्चातही काही प्रमाणात स्थैर्य येऊ शकते.

## चर्चा आजची | विकासात्मक प्रकल्प शेतकऱ्यांच्या मुळावर

**सुयोग आंग्रे**

रायगड जिल्ह्याची विकासाच्या दिशेने वाटचाल नव्हे विकासाच्या दिशेने गगन भरारी घेत असल्याचे सुखद चित्र सर्वत्र रंगवले जात आहे. भौगोलिक नकाशावर आधी भाताचे कोठार, पर्यटन वाढीचा ओघ वाढल्याने संभाव्य पर्यटन जिल्हा, वाढत्या औद्योगिकरणामुळे औद्योगिक जिल्हा अशी कालपरत्वे रायगड जिल्ह्याची ओळख बदलत गेल्याचे सर्वश्रुत आहे. देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईच्या नजीकचा आणि विकासाच्या दृष्टीने पटलावर येणारा दुसरा जिल्हा म्हणून रायगड जिल्ह्याकडे पाहिले गेले. मुंबई नंतर ठाणे जिल्ह्याचा विकास प्रथम करण्यात आला. परंतु विकास केवळ गृह उद्योगांनी होणार नव्हता म्हणून औद्योगिक क्रांती रायगड जिल्ह्यात घडवून आणण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात आली. शासनाच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून उद्योगांचे जाळे रायगड जिल्ह्यात उभारण्यात आले. शेकडो विविध उद्योगांना उद्योग निर्मितीसाठी रान मोकळे करून देण्यात आले. त्यासाठी भूसंपादनावर अधिक जोर देण्यात आला. जिल्ह्यातील सात ठिकाणी प्रत्यक्षात औद्योगिक वसाहती उभारण्यात आल्या. हे सारे उद्योगाचे जाळे उभे करीत असताना त्या उद्योगांमधून निर्माण होणाऱ्या रोजगाराचे मृगजळ रायगडवासीयांना दाखविण्यात आले. प्रत्यक्षात या कंपन्यांमधून स्थानिकांना रोजगार किती मिळाला हा संशोधनाचा विषय आहे. उद्योग उभे करताना शासनाने शासकीय जमीन ताब्यात न घेता खासगी जमिनींचा व्यवहार निर्णयावर भर दिला. विकास आणि प्रकल्प यांच्या नावाचा उपयोग करून शासनाने एमआयडीसीच्या माध्यमातून जिल्ह्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनींचे संपादन करण्याचे जाहीर करून शेतकऱ्यांनाच नोटिसा काढल्या कवडीमोल भावाने शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून त्यावर एमआयडीसीचा शिक्का मारण्यात आला. आजही जिल्ह्यात हजारो हेक्टर जागा प्रकल्प किंवा उद्योग उभे न केल्याने पडीक झाल्या आहेत. त्यानंतर रायगड जिल्ह्याकडे धनदांडग्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. रायगड जिल्हा देशाचे आर्थिक केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना सेझचे भूत रायगडकरांच्या खास करून किनाऱ्या लगतच्या पेण, उरण, पनवेल आणि अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसवण्याचा डाव आखण्यात आला. हा डाव कायद्याचा आधार घेत शेतकऱ्यांनी उधळून लावला. यामुळे सेझ रायगड जिल्ह्यातून हद्दपार झाला. खासगी मालकांच्या साहाय्याने उभा राहणार सेझ प्रकल्प उभारण्यासाठी वेळेत भूसंपादन झाले नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत देण्याशिवाय शासनाकडे दुसरा कोणताच पर्याय उरला नाही. या लढाईत शेतकऱ्यांच्या पाठीशी राजकीय वरदहस्त होते. हे हात निश्चितपणे शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांचे होते. हा लढा ऐतिहासिक बनल्याचे सर्वश्रुत आहे. उद्योगांच्या निर्मितीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी सहजासहजी मिळत नसल्याचे लक्षात येताच दळणवळणाचा आराखडा तयार करून शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित निर्णयावर अधिक भर देण्यात आला. रायगड जिल्हा दळणवळणासाठी पूरक जिल्हा असल्याने शासनाने विकासात्मक दृष्टिकोन समोर ठेवत रस्त्यांचे महामार्ग बनविण्याबरोबरच महामार्गांचे कॉरिडॉर बनवण्याच्या दिशेने हालचाली सुरु केल्या. जलमार्गाने रायगड जिल्हा आंतरराष्ट्रीय बंदरांना जोडला गेला आहे. देशाचे सर्वाधिक मोठे बंदर जेएनपीए रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात आहे. यानंतर जलावाहतुकीचा प्रवास पर्याय लक्षात घेऊन अनेक ठिकाणी जलमार्ग निर्माण करून जेट्ट्यांची उभारणी करण्यात आली आहे. हा विकासाचा दृष्टिकोन उत्तम असलातरी स्थानिक मत्स्य शेती करणारे कोळीबांधवांचा उदरनिर्वाहाचा पत्ता शासनाने ताब्यात घेतला. त्यामुळे कोळी बांधवांना मासेमारी करण्यासाठी खोल समुद्रात जाण्या व्यतिरिक्त कोणताच पर्याय उरला नाही. उद्योग उभारल्यानंतर दळणवळणाची सुसुत्रता आणण्यासाठी जिल्ह्यात असणाऱ्या रस्त्यांचे महामार्ग करण्यावर भर दिला. निर्णय जनतेच्या भल्याचाआहे. हे निश्चितपणे हे महामार्ग सुस्थितीतआणण्यासाठी शासनाला तब्बल एक पाटातून अधिकच कालावधी लागतो. त्यात महामार्ग अद्यापही अपूर्णच आहे. मुंबई - गोवा महामार्गाबद्दल बोलायचं झाले तर नियोजनाचा अभाव म्हणा किंवा ठेकेदारांचा हलगर्जीपणा म्हणा यामध्ये भरडला जातोय तो रायगडाचा नागरिकच. महामार्गाचे चौपदरीकरण करण्याची वेळ आली तेव्हा रडारवर आले ते रायगड जिल्ह्यातील षटकारीच यावेळीही कवडीमोल भावाने जमिनींचे संपादन केले. शेतकरी जमीन आणि घरांना मुकला अशी परिस्थिती रायगड जिल्ह्यातील महामार्गानजीकच्या गावांमधील आहे. हा महामार्ग अद्याप गुणवत्ता पूर्ण पूर्ण झालेला नसताना ग्रीन कॉरिडॉर, सागरी महामार्ग, दिल्ली मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉर यांची उभारणी करण्यावर भर देण्यात आला. दळणवळणाचे जाळे विनंयुट आले परंतु शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनीचे भूसंपादन यामध्ये अग्रस्थानी आहे. हा सारा सारांश सांगण्याचा प्रपंच इतकाच आता अलिबाग विरार कॉरिडॉरचा महत्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. या महामार्गाला सुरुवातीच्या काळात विरोध नव्हता. परंतु म्हणतात ना मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. त्या प्रमाणेच शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यासाठी शासनच तगादा सुरु झाला आहे. परंतु हे करताना शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी घेऊन कवडीमोल भावाने जमिनी खरेदी करणायचा घाट घातला जात आहे. कष्टकऱ्यांना विश्वासात नाही तर त्यांचा विश्वासघात करून त्यांच्या जमिनी संपादित करून त्यांना देशोधडीला लावण्याचा डाव शासन आकाशात असलायचा आरोप आता शेतकऱ्यांनी करायला सुरुवात केली आहे. आता पाणी डोक्यावरून जाऊ लागल्याने षटकार संघर्षाच्या तयारीत आहेत. हा संघर्ष रक्तरंजित नसावा एवढंच.

## लोकसंसद

### तापमानवाढीस आपणच जबाबदार

सध्या देशाच्या बहुसंख्य भागात अतितीव्र उष्णतेच्या झळा वाढल्या असून अनेक ठिकाणी तापमानाने ४२ ते ४७ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे. महाराष्ट्रालाही तीव्र उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत असून विशेषतः विदर्भ आणि मराठवाडा भागात तापमानाचा पारा ४४ ते ४७ अंश सेल्सिअसवर गेला आहे. सूर्य अक्षरशः आग ओकतो आहे असे वाटत आहे. यंदाच्या मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यात राज्यात उष्माघाताच्या ९५ प्रकरणांची आणि चार संशयित मृत्यूंची नोंद झाली आहे. वास्तविक अशा तापमानवाढीस मानवी हस्तक्षेप



पूर्णतः जबाबदार आहे. विकासाच्या नावाखाली जगभर गेल्या दोनशे-अडीचशे वर्षात प्रचंड प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली. वाढत्या औद्योगीकरणामुळे आणि झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत आहे. विषारी वायूंमुळे होणाऱ्या हवेच्या प्रदूषणामुळे एकूणच पर्यावरणाचे संतुलन बिघडलेले आहे. अवेळी येणारा अवकाळी पाऊस, अचानक होणारी गारपीट, कधी भयंकर अतिवृष्टी, एखाद्या वर्षी पावसाचे कमी झालेले प्रमाण आणि आता उन्हाळ्यात तापमान वाढून असह्य चटके देणाऱ्या उन्हाच्या तीव्र झळा हे सर्व नैसर्गिक ऋतूचक्रावर झालेल्या दुष्परिणामांचे निदर्शक आहेत. अशा परिस्थितीत तापमानवाढीवर रोख लावण्यासाठी गांभीर्याने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष | जागतिक रेड क्रॉस दिन

जगभरात शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी दरवर्षी ८ मे हा दिवस 'रेडक्रॉस दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनालाच 'आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन' म्हणून देखीलसाजरे केले जाते, या दिनाला रेड क्रेसेंट दिन म्हणूनही ओळखले जाते. ही एक आंतरराष्ट्रीय मानवतावादी चळवळ आहे. राष्ट्रीयता, वर्ण, धर्म, लिंग इत्यादी गोष्टींचा विचार न करता जगभरातील लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हे या चळवळीचे ध्येय आहे. पहिल्या महायुद्धानंतर, रेड क्रॉसला शांततेत मोठे योगदान म्हणून




सादर करण्यात आले आणि रेड क्रॉस युद्धविरामाचा अभ्यास करण्यासाठी रेड क्रॉसच्या १४ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत एक आंतरराष्ट्रीय आयोग स्थापन करण्यात आला. १९३४ मध्ये टोकियो येथे झालेल्या १५ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत रेड क्रॉस युद्धविरामाचा अहवाल सादर करण्यात आला आणि त्याची तत्त्वे जगभरातील विविध प्रदेशांमध्ये लागू होण्यासाठी मंजूर करण्यात आली. १९४६ मध्ये दुसऱ्या महायुद्धात, टोकियो प्रस्ताव अंमलात आला. लीग ऑफ द रेड क्रॉस सोसायटीज (LORCS) च्या गव्हर्नर्स बोर्डाने वार्षिक उत्सव साजरा करण्याची शक्यता विचारली, ज्याला नंतर इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रेड क्रॉस सोसायटीजची जनरल असेंब्ली म्हटले गेले. दोन वर्षांनंतर ८ मे १९४८ रोजी रेड क्रॉसचे संस्थापक हेन्री ड्युनंट यांच्या जयंतीदिनी दरवर्षी जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्याचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला. १९८४ मध्ये अधिकृतपणेत्याला जागतिक रेड क्रॉस आणि रेड क्रेसेंट दिन असे नाव देण्यात आले. हा दिवस अन्नाची कमतरता, अनेक नैसर्गिक आपत्ती, युद्ध तसेच साथीच्या आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना समर्पित आहे. खरोखर गरजू लोकांना मूलभूत सुविधा देखील पुरवल्या जातात. अनेक सरकारी आणि खाजगी संस्था अनेक आपत्तींनी ग्रस्त असलेल्या गरजू लोकांना मदत करण्यासाठी सक्रिय सदस्य बनतात. रेडक्रॉसची आंतरराष्ट्रीय समिती आणि तिच्या सदस्यांकडून त्यांच्या मानवतावादी उपक्रमांना चालना देण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम आणि कार्यक्रम आयोजित केले जातात. ते लोकांना स्वतःचे जीवन वाचवण्यासाठी आणि पीडितांच्या प्रतिष्ठेची काळजी घेण्यासाठी प्रेरित करतात. हा दिवस रेडक्रॉस संघटनांच्या सर्व विभागांद्वारे पूर, भूकंप म्हणजेच नैसर्गिक आपत्तींमुळे पीडित लोकांना मदत करण्यासाठी आणि आपत्कालीनपरिस्थितीपासून त्यांचे जीवन वाचवण्यासाठी साजरा केला जातो. मानवता, निष्पक्षता, तटस्थता, स्वातंत्र्य, स्वयंसेवा, एकता आणि सार्वत्रिकता ही रेड क्रॉस सोसायटीची सात मुख्य तत्वे आहेत. रेड क्रॉस सोसायटीचे मुख्य उद्दिष्ट रक्त गोळा करणे आहे. रेड क्रॉसला पाठिंबा देण्यासाठी आणि रक्तदान करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करण्याचे अनेक मार्ग आहेत. रेड क्रॉसचे काम प्रथमोपचार, आपत्कालीन प्रतिसाद, आरोग्य आणि सामाजिक काळजी प्रदान करणे, आपत्तींसाठी तयारी करणे, निर्वासित सेवा देणे आणि हरवलेल्या कुटुंबांना शोधण्यात लोकांना मदत करणे हे देखील आहे. खरं तर, युद्धाच्या काळात, रेड क्रॉस सशस्त्र संघर्षात लोकांचे संरक्षण करण्यास मदत करते.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**
८ मे
१) श्री.गजेंद्र हरिचश्चंद्र नाखवा
मु.कुरूळ, अलिबाग,
दि.८-५-१९५५
२)श्रीम.सुमन मनोहर पाटील
मु.नवेनगर, अलिबाग
दि.८-५-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**
**दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**

# निविदा प्रक्रियेत एआयचा वापर करा

## • मंत्री ॲड. आशिष शेलार यांचे निर्देश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
महापालिकेची निविदा प्रक्रिया मानवी हस्तक्षेप शुन्य होऊन ती अधिक पारदर्शक होईल, निवेदेतील व्हेरिएशनवर लक्ष राहिल, कामाची अंमलबजावणी प्रभावी होईल, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करा, असे निर्देश मुंबई उपनगर पालकमंत्री तथा इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बध्दिमत्ता विभाग ॲड. आशिष शेलार यांनी दिले.



राज्याच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाला राज्य मंत्री मंडळाने मंजूरी दिली असून त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने काम करण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी मुंबई महापालिका आणि इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाची संयुक्त बैठक सह्याद्री अतिथीगृहावर घेतली. या बैठकीला महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, महाआयटीचे संचालक संजय काटकर, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संचालिका भूवनेश्वरी यांच्यासह महापालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुंबई महापालिका दैनंदिन कामकाजात एआयचा वापर कशा पध्दतीने करते आहे, याचे सादरीकरण महापालिकेतर्फे करण्यात आले. नालेसफाईमध्ये पारदर्शकता यावी, म्हणून तसेच नागरी सेवांमध्ये पारदर्शक व गतिमानता यावी, म्हणून एआयचा वापर करण्यात येत असल्याचे सादरीकरण करण्यात आले. नागरिकांच्या तक्रारी चॅट बॉट या एआय तंत्रज्ञानामार्फत विभाग कार्यालयात संकलित करण्यात येत असल्याचे पालिकेने सांगितले. मात्र यामध्ये एआयचा वापर करुन अधिकची सुधारणा करा व कोणत्याही महापालिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची तक्रार त्याने बोलल्यानंतर तो व्हिडीओ रेकॉर्ड होऊन तो व्हिडीओ संबंधित विभागकडे जाईल व त्यावर कारवाई तातडीने कारवाई अथवा कार्यवाही होईल, अशा पध्दतीने नियोजन करा. तसेच, मुख्यमंत्री फडणवीस यांनी ज्या पद्धतीने मंत्रालयात ई-फाईल व ई-स्वाक्षरीची संकल्पना प्रभावीपणे राबवली आहे; त्याच पध्दतीने मुंबई महापालिकेत ही संकल्पना राबवा व पेपरलेस कारभाराच्या दृष्टीने कामकाज होईल याचे नियोजन करा. तसेच, टेंडर पद्धतीमध्ये पारदर्शकता येणे आवश्यक आहे. महापालिका टेंडरमध्ये अनेकवेळा व्हेरिएशन केले जाते; त्यावर एआय नियंत्रण आणा, जेणेकरून नागरिकांना अशा पध्दतीने झालेल्या कामांची माहिती मिळू शकेल. तसेच, व्हेरिएशनमध्ये करण्यात आलेला निर्णय योग्य आहे की नाही हे एआयमार्फत स्पष्ट होईल अशा पध्दतीचे नियोजन करा, अशा सूचाना मंत्री ॲड. शेलार यांनी यावेळी केल्या.

> **महापालिकेच्या कामकाजात नागरिक सहभागीता वाढावी. तरुणांच्या नवनवीन कल्पना समजून त्याचा वापर प्रशासनामध्ये करता यावा, यासाठी तरुणांची हे हॅकेथॉन आयोजित करा.**
> **– मंत्री शेलार**

# उघड्यावरच मुदतबाह्य औषधांचा खच

## प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह

**। पालघर । प्रतिनिधी ।**
वसई पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ गटाराशेजारी मोठ्या प्रमाणात मुदतबाह्य औषधांच्या बाटल्या फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित औषधांची मुदत फेब्रुवारी २०२६ मध्ये संपलेली असल्याचे प्राथमिक पाहणीत दिसून आले असून, त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट न लावता उघड्यावर टाकण्यात आल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



शासकीय रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा भासत असताना दुसरीकडे मोठ्या प्रमाणात औषधे अशा प्रकारे वाया घालवली जात असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गटाराशेजारी पडून असलेल्या या औषधांमुळे पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, त्यातून सार्वजनिक आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. औषधांतील रासायनिक घटक पाण्यात मिसळल्यास त्याचा परिणाम स्थानिक जलस्रोतांवर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

मुदतबाह्य औषधांची सुरक्षित विल्हेवाट का लावण्यात आली नाही, ती उघड्यावर टाकण्यामागे जबाबदार कोण, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई होणार, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

# महाबळेश्वरमधील ६० कुटुंबांना दिलासा

## • लीज प्रॉपर्टीमधील जागा निर्वाहासाठी देण्याचे निर्देश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
महाबळेश्वर येथे शासनाच्या जागेवरील लीज प्रॉपर्टीमध्ये वर्षानुवर्षे ६० कामगार कुटुंबे काम करत आहेत. या प्रॉपर्टीवरील लीज संपल्यामुळे ही कुटुंबे बेघर होऊ शकतात. यामुळे २५ मार्च २०२६च्या शासन निर्णयानुसार सर्वेक्षण करुन पात्र कुटुंबांना नियमानुसार जागा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

महाबळेश्वर येथील विविध प्रश्नांबाबत महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी महाबळेश्वर येथील लीज प्रॉपर्टीमध्ये काम करणाऱ्या कुटुंबीयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शासनाने सर्वांसाठी घरे ही संकल्पना मांडली असून त्यासाठी २५ मार्च रोजीच्या शासन निर्णयानुसार २०११ पूर्वी शासकीय जागेवर असलेले अतिक्रमण नियमानुकुल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयाचा आधार घेऊन महाबळेश्वर येथील लीज प्रॉपर्टीमध्ये वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कामगारांचे सर्वेक्षण करुन पात्र ठरणाऱ्या कुटुंबीयांना नियमानुसार देय ठरणाऱ्या जागेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

# हातभट्टीची दारू जप्त

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**
चिपळूण तालुक्यातील बोरगाव येथील महादेववाडी परिसरात पोलिसांच्या पथकाने बेकायदेशीर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली आहे. ही कारवाई सोमवारी (दि.४) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. संशयित आरोपी हनुमंत सोमनाथ म्हादे याने महादेववाडी येथील एका गोठ्याच्या पाठीमागे, लोकांच्या नजरेत पडणार नाही अशा आडोशाला ही गावठी दारू लपवून ठेवली होती. या गुप्त साठ्याबाबत पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली होती. माहिती मिळताच चिपळूण पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि सापळा रचून संशयिताला रंगेहात पकडले. पोलिसांनी केलेल्या या छाप्यात घटनास्थळावरून ९५० रुपये एकूण किमतीची तब्बल ९ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीस कर्मचारी किरण सुभाष केदार यांनी पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून संशयित हनुमंत म्हादे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, जप्त केलेली दारू पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

# वाशी गावातील विकासकामांना मिळणार गती

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
नवी मुंबई महानगरपालिका वाशी विभागाला नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी बुधवारी भेट देऊन विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. नगरसेवक निशांत भगत यांनी वाशी गावातील स्थानिक नागरिकांच्या विविध मागण्या आणि पायाभूत सुविधांच्या आवश्यकतेबाबत आयुक्तांना सविस्तर माहिती दिली. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन शहरातील उपाययोजना करणे, हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश होता. यावेळी आयुक्तांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.



यावेळी नगरसेवक निशांत भगत यांनी काही अडचणी आयुक्तांच्या निदर्शनात आणून दिल्यानंतर आयुक्तांनी वाशी गावातील जुन्या भुयारी मार्गाची सुधारणा करून तो नागरिकांच्या वापरासाठी अधिक सुलभ करण्यात यावा. तसेच, सायन-पनवेल महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने सर्व्हिस रोड उभारण्याचे निर्देश दिले आहेत. गावात सुसज्ज मच्छी व भाजी मार्केट उभारण्याबाबत सकारात्मकता दर्शवली. यामुळे अनधिकृत फेरीवाल्यांना आळा बसून स्थानिक कोळी महिला आणि व्यापा-यांना चांगल्या सुविधा उपलब्ध होऊन नागरिकांना पदपथांचा वापर करता येईल. तसेच, नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील प्रत्येक गावात सुगंधी अंगण अभियान अधिक प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना आयुक्तांनी अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.

> **लोकहिताच्या कामांना गती देऊन नवी मुंबईला अधिक सुविधासंपन्न आणि स्वच्छ, सुगंधी बनवण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे. नागरिकांच्या सुरक्षेला आणि सोयींना आमचे सर्वोच्च प्राधान्य राहील.**
> **– डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नमुंमपा**

# इसम बेपत्ता

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून एक इसम बेपत्ता झाल्याची घटना घडली असून तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अंकुश सुरेश धुलप ( ३७) असे या इसमाचे नाव असून त्याचा रंग सावळा, उंची ४ फुट ६ इंच, बांधा सडपातळ, चेहरा सरळ लांब, केस काळे, अंगात नेसुस हिरव्या रंगाचा टि शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट, पायात चप्पल, मराठी, हिंदी भाषा बोलता येते. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक, व्ही.बी. शिरसाठ यांच्याशी संपर्क साधावा.



# जिल्हा महिला जनसंपर्क प्रमुखपदी वर्षा सहस्त्रबुद्धे

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**
पोलीस मित्र संघटना, नवी दिल्ली या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष चौधरी यांच्या आदेशानुसार आणि संघटनेचे राष्ट्रीय जनसंपर्क प्रमुख गजानन भगत यांच्या सूचनेनुसार तसेच संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनीलभाऊ पाटील व महाराष्ट्र राज्य महिला आघाडी अध्यक्षा सुजाता चिंता यांच्या सहमतीने नागोठण्याजवळील निडी (ता. रोहा) येथील सामाजिक कार्यकर्त्या वर्षा ओमकार सहस्त्रबुद्धे यांची पोलीस मित्र संघटनेच्या रायगड जिल्हा महिला जनसंपर्क प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.



आपल्या संघटनेचे महत्त्व ओळखून आपण पोलीस, नागरिकांना मदत कराल, संघटनेची प्रतिमा जनतेत उज्वल कराल आणि संघटनेचा जनाधार मजबूत कराल. असे कार्य आपल्या हातून घडेल अशी अपेक्षा सहस्त्रबुद्धेंना दिलेल्या नियुक्ती पत्रात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आले.

# घरफोडीत लाखोंचे दागिने लंपास

**पनवेल :** घरात शिरून चोरट्याने सुमारे १४ लाख २५ हजारांचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाणे येथे मंगळवारी (दि.५) गुन्हा दाखल केला आहे. पनवेलच्या देवदगाव येथील अनमोल रेसिडेन्सीमध्ये राहणारे अक्षय प्रताप पाटील यांच्या घरात दरवाजातून प्रवेश करून ही चोरी झाली. घरातील कपाट उघडून सोन्याचे गंठण, राणीहार, अंगठ्या असा सुमारे १४ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला.

# 'आठवणींतील बाळासाहेब' कार्यक्रमाचे आयोजन

**। ठाणे । प्रतिनिधी ।**
शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त व दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या अमृत महोत्सवी जन्मत्सोवानिमित्त कल्याणमध्ये जनमत संस्थेच्या पुढाकाराने आठवणींतले बाळासाहेब व आनंद दिघे हा कार्यक्रम रविवार दि. १० मे रोजी सकाळी रंगणार आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरु असून त्यानिमित्त महाराष्ट्रात प्रथमच हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व कल्याण शहराचे एक वेगळे नाते आहे. शिवसेनाप्रमुख अनेक वर्षे कल्याण शहरात वास्तव्यास होते. जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या आठवणी जागृत करण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार व समाजकार्यकर्ते एकत्र येणार आहेत.

रविवार दि.१० मे रोजी सकाळी ११ वाजता आचार्य अत्रे नाट्यगृहाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये होणाऱ्या या आगळ्यावेगळ्या स्मृतीसमारोहास ज्येष्ठ पत्रकार, अनेक दैनिकांचे माजी संपादक, स्तंभलेखक, डॉ. सुकृत खांडेकर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष कुमार कदम, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, हिंदू मंचचे दिनेश देशमुख, जनता सहकारी बँकेचे डॉ. चंद्रशेखर तांबडे व ज्येष्ठ पत्रकार तुषार राजे शिवसेनाप्रमुख व आनंद दिघे यांच्या आठवणींना उजाळा देणार आहेत.

या कार्यक्रमानिमित्ताने दैनिक जनमतच्या ३५व्या वर्धापनदिन विशेषांकाचे प्रकाशन व ज्येष्ठ पत्रकारांचा गौरव करण्यात येणार आहे. जनमत या सामाजिक, सांस्कृतिक संस्थेचे तेजस राजे यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जनमत संस्थेने केले आहे.

**इस्रोसह नासा केंद्राला भेटीची मिळणार संधी** | **शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची माहिती**

# 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' उपक्रमाला मान्यता

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' उपक्रमाअंतर्गत राज्यातील विज्ञान प्रदर्शनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना इस्रो आणि अमेरिकेतील नासा केंद्राला भेट देण्याची संधी मिळणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.



विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती आणि नवोपक्रमशीलतेला प्रोत्साहन देऊन त्यांना भविष्यासाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रातील प्रगत संशोधन संस्थांचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार असून, त्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना मिळून भविष्यातील संशोधक घडण्यास मदत होणार असल्याचा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाबाबत आवड निर्माण व्हावी, तसेच अनुभवाधारित शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

या उपक्रमांतर्गत राज्यातील विज्ञान प्रदर्शनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विज्ञान केंद्रांना भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तालुकास्तरावर विज्ञान प्रदर्शनात प्रथम येणाऱ्या एकूण २१४८ विद्यार्थ्यांना जवळच्या विज्ञान केंद्रांना भेट देण्याचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर निवड झालेल्या १८० विद्यार्थ्यांना बंगळुरू येथील इस्रो केंद्राला भेट देण्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

याशिवाय उच्च प्राथमिकस्तर (इयत्ता सहावी ते आठवी) आणि माध्यमिक व उच्च माध्यमिकस्तर (इयत्ता नववी ते १२ वी) चे विद्यार्थी गटाकरिता राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्ट ठरलेल्या ५१ विद्यार्थ्यांना अमेरिकेतील नासा केंद्राला भेट देण्याची विशेष संधी देण्यात येणार असून, या दौऱ्यासाठी सुमारे ३.३० कोटी रुपयांच्या खर्चास शासनाने मान्यता दिली आहे.

### स्वतंत्र समित्या स्थापन करणार

उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात येणार असून, संबंधित स्तरांवरील अधिकाऱ्यांवर नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या उपक्रमासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समिती तसेच राज्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमधून उपलब्ध करून दिला जाणार आहे.

# निवडक

## 'सुनेहरी यादे' ऑर्केस्ट्राला प्रतिसाद

**रोहा :** महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून नगर पालिकेच्या ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे :सुनहरी यादे' हा प्रसिद्ध ऑर्केस्ट्रा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमात दिवंगत सहा महान गायकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या अजरामर गाण्यांची सुरेल मैफल रंगली आणि उपस्थित रसिकवर्ग अक्षरशः मंत्रमुग्ध झाला. कार्यक्रमात रफिक नाटूस्कर, मुब्बाशीर दाखवे, रेश्मा पाटणकर, शर्मिला जंगम, डॉ. चंद्रशेखर, वैभव पोटले, शैलेश मोघे आणि अपूर्वा पांचाळ यांनी सादर केलेल्या सुरेल गाण्यांनी वातावरण भारावून गेले. विशेष आकर्षण ठरले ते मुंबईहून आलेले प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्या ग्रुपमध्ये कार्यरत असलेले जयवंत दादा परदेशी यांचे मनमोहक सादरीकरण. नागोठणे येथील निवेदक प्रविण धाडसे यांनी आपल्या प्रभावी सूत्रसंचालनाने कार्यक्रमाला रंगत आणली आणि रसिकांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमासाठी सुनील लांगी, रवी दुर्गावकर, सुभाष भावसार व सहकारी मित्रमंडळ यांचे विशेष सहकार्य लाभले. एकूणच, महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने रोहेकरांना एक अविस्मरणीय संगीतमय पर्व अनुभवायला मिळाले, अशी भावना उपस्थित रसिकांनी व्यक्त केली.



## कामगार संघटनेचे उद्घाटन

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील गोदरेज सिटी ठोंबरेवाडी, खानावळे येथे महाराष्ट्र राज्य बहुउद्देशीय माथाडी व ट्रान्सपोर्ट जनरल कामगार संघटनेचे मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. अशोक निकम (जिल्हाध्यक्ष नवी मुंबई व रायगड जिल्हा) यांच्या मार्गदर्शनाखाली खानावळे-ठोंबरेवाडी एकता संघाच्या वतीने या शाखेची स्थापना करण्यात आली असून गोदरेजचे रचीत नेगी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मंगेश लबडे यांच्यासह किरण लबडे, दिनेश लबडे, रुपेश मांडे, संदेश मांडे, सुभाष ठोंबरे, निखिल सोनावळे, मनोज लबडे, सचिन लबडे, योगेश शिंदे, रोहित ठाकूर, प्रविण सोनावळे, स्वप्निल लबडे, संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष महेंद्र लबडे, जिल्हा उपाध्यक्ष नवी मुंबई व रायगड विलास ठोंबरे, मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.

## नागोठणे येथे नेत्रचिकित्सा शिबीर




**नागोठणे :** नागोठणे लायन्स क्लबचे सदस्य जयराम पवार यांनी आपल्या दिवंगत मातोश्री लक्ष्मीबाई मारुती पवार यांच्या स्मरणार्थ आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल, नवीन पनवेल यांच्या सहकार्याने नागोठणे लायन्स क्लबने येथील शांतीनगर भागातील स्व. बाळासाहेब ठाकरे बाल उद्यानात बुधवारी (दि.६) नेत्रचिकित्सा शिबीर आयोजित केले होते. या शिबिरात २० नागरिकांनी त्यांच्या डोळ्यांची तपासणी केली. यामध्ये मोतिबिंदू आढळलेल्या आठ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर व परिसरातील नागरिक नेत्र तपासणीसाठी यावेळी उपस्थित होते. लायन्स क्लबच्या कार्यक्रमाला नेहमी सहकार्य करणारे मोहन म्हात्रे व फिजिओथेरपिस्ट डॉ. काव्या टेमकर यांचा या शिबिराच्या निमित्ताने विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी लायन डॉ.अनिल गीते यांनी मोतीबिंदू शास्त्रक्रिये नंतरची डोळ्यांची निगा व काळजी याविषयी अतिशय महत्वपूर्ण माहिती उपस्थित नागरिकांना दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी केले.

## एसीच्या कॉपर पाइपची चोरी


**पनवेल :** कळंबोली परिसरात चोरीच्या घटनांनी पुन्हा डोके वर काढले असून, चोरट्यांनी आता शैक्षणिक संस्थांनाही लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. कळंबोली येथील 'दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट'मधील एसीचे कॉपर पाईप अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास कापून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सेक्टर-५ई, केएल-१ परिसरातील इन्स्टिट्यूटच्या बाहेर बसविण्यात आलेल्या एसी युनिटमधील महागडे तांब्याचे पाईप चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेत चोरी केले. सकाळी इन्स्टिट्यूट चालकाने हा प्रकार लक्षात घेतला. या घटनेमुळे संस्थेला आर्थिक फटका बसला असून, एसी बंद पडल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासातही अडथळे निर्माण झाले आहेत. दरम्यान, कळंबोली परिसरात गेल्या काही दिवसांत चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वीच एका हळदी समारंभात महिलेचे सुमारे १८ तोळे दागिने हिसकावण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता एसी पाईप चोरीच्या घटनेमुळे व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तांब्याच्या वाढत्या किमतीमुळे अशा प्रकारच्या चोरींना चालना मिळत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिक व व्यावसायिकांनी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांवर लगाम लावावा, अशी मागणी केली आहे.



## अन्नु पारचे यांचा प्रामाणिकपणा

**पनवेल :** प्रभाग क्र. १८ मधील वाल्मिकी नगर येथे राहणाऱ्या व वाल्मिकी समाजातील अन्नु अशोक पारचे यांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हाऊसकीपिंगचे काम करत असताना त्यांना रोख रक्कम व सुमारे २ लाख रुपयांचा चेक सापडला. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तो चेक व रक्कम तात्काळ आपल्या वरिष्ठांकडे सुपूर्द केला. त्यांच्या या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व मूल्याधिष्ठित वर्तनाची दखल घेत संबंधित संस्थेकडून त्यांना सुपरवायझर पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल पनवेल महापालिकेचे महापौर सन्माननीय नितीन पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सोबत नगरसेवक दशरथ म्हात्रे हेही होते. अन्नु पारचे यांच्या या कृतीमुळे वाल्मिकी समाजाची प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि सामाजिक बांधिलकी जपणारी परंपरा अधोरेखित झाली आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.




PNP
INFRAPROJECTS
WISHING
Mr. Nrupal
Jayant Patil
HAPPY
BIRTHDAY
WITH BEST COMPLIMENTS FROM
PNP INFRAPROJECTS PVT. LTD.
TEL: GATEWAY: 2288 5220 / 2288 5221
MANDWA : 021 41- 237087
ALIBAUG : 021 41- 225403
ADD: GATEWAY : GATEWAY PLAZA, COUNTER No. 8
MANDWA : JETTY
ALIBAUG : PRABHAKAR PATIL NAGAR

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे रांजणपाडा, ता.अलिबाग जि.रायगड, राज्य-महाराष्ट्र येथील खालील वर्णनाची मिळकतीपैकी क्षेत्र (हे.आर.) ०-४२-४० चे खरेदीखत करण्याचे विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | पोट खराबा | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १) रांजणपाडा ता.अलिबाग जि.रायगड | ५२ | १-१०-७० | ०-३५-१० | २५.६३ | विणा विकास पाटील<br>विनय विकास पाटील<br>वृषाली विकास पाटील<br>प्रमोद नथुराम पाटील |

वरील वर्णनाच्या मिळकतीमध्ये खरेदी देणार यांनी ४ प्लॉट पाडलेले आहेत. त्यापैकी पहिल्या क्रमांकाचा प्लॉट ज्याचे क्षेत्र ०-४२-४० एवढे आहे. तो प्लॉट या खरेदीखताचा विषय आहे.

तरी सदर मिळकतीमधील आमच्या अशिल विकत घेणार असणारे क्षेत्र विकत घेण्या संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा, कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकत खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल करावेत. याप्रमाणे सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०७/०५/२०२६

सही/-
**ॲड.प्रवीण मधुकर ठाकूर**
**जिल्हा व सत्र न्यायालय**
**रायगड-पनवेल/अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

अर्जदार तर्फे वकिल ॲड. अतुल अरविंद चौगुले
**श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायधिश (क.स्तर) सो., यांचे कोर्टात**
दिवाणी चौ. अर्ज क्र. १९/२०२६

**जाहीर नोटीस**

सौ. सोनाली संजय पेडणेकर
वय - ५६ वर्षे, धंदा - गृहिणी ...अर्जदार
रा. लिम्बोनी आळी, बोर्ली पंचतन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.

विरुद्ध

कोणीही नाही ...सामनेवाला

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे- बोर्लीपंचतन ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील मयत वडिल कै. रमेश दत्ताराम जुवेकर यांचे दिनांक १०/०२/२००६ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मयताचे वाली वारस अर्जदार या आहेत. मयत कै. रमेश दत्ताराम जुवेकर यांचा मु. बोर्ली पंचतन, ता. श्रीवर्धन, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पश्चात अर्जदार यांचे नाव शासकीय, निमशासकीय, बँका, पतपेढ्या, पतसंस्था दाखल करणे करिता अर्जदार या कायदेशीर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता. ०५/०५/२०२६

**सही/-** **क. लिपिक** **न्यायालय, श्रीवर्धन**
**सही/-** **सहाय्यक अधिक्षक, दिवाणी** **न्यायालय, श्रीवर्धन**

अर्जदार तर्फे वकिल ॲड. अतुल अरविंद चौगुले
**श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायधिश (क.स्तर) सो., यांचे कोर्टात**
दिवाणी चौ. अर्ज क्र.२०/२०२६

**जाहीर नोटीस**

१) श्रीम. सविता यशवंत बने
वय वर्षे ६२ धंदा - गृहिणी
रा. चिरगाव, सडकेची वाडी, पो. कोलवट,
ता. म्हसळा, जि. रायगड.
२) रामेश्वरी रामचंद्र म्हातले अर्जदार
वय वर्षे ५१,
धंदा गृहिणी
रा. ढोरजे, धोराजे, चिखलप,
ता. म्हसळा, जि. रायगड.

विरुद्ध

१) श्री. सुरेंद्र सुरेश कदम
वय वर्षे ३४, धंदा
२) रूपाली सुरेश कदम
वय वर्षे ३१, धंदा - गृहिणी
सामनेवाला क्र. १ व २ रा. मांदाटणे पो. सामनेवाला
लिपणी वावे, आंबेत
ता. म्हसळा, जि. रायगड.
पिन नं ४०२१०५
३) श्रीम. मंजीरी मनोज मोरे
वय वर्षे ३२, धंदा - गृहिणी
रा. कासरकोंड, वाळवटी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड.

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे - मु. चिरगाव, सडकेची वाडी, पो.कोलवत ता.म्हसळा, जि.रायगड येथील मयत कै. लक्ष्मण भिकू पाडावे यांचे दिनांक ३०/०३/२०२१ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मयताचे वाली वारस अर्जदार क्र. १ ते २ या आहेत. मयत कै. लक्ष्मण भिकू पाडावे यांचा मु. चिरगाव, सडकेची वाडी, पो.कोलवत ता. म्हसळा, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पश्चात अर्जदार यांचे नाव शासकीय, निमशासकीय, बँका, पतपेढ्या, पतसंस्था दाखल करणे करिता अर्जदार या कायदेशिर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक ७/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता.०७/५/२०२६

**सही/-** **क. लिपीक** **न्यायालय, श्रीवर्धन**
**सही/-** **सहाय्यक अधिक्षक, दिवाणी** **न्यायालय, श्रीवर्धन**

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक सोमनाथ भीमराव पवार मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन : -**
**मौजे नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १६६ | १-३२-८० | ०-७२ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. ०८/०५/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट तुषार गणेश कानडे**
कार्यालय - कळंब रोड कॉर्नर, जवळ
हॉटेल अन्नपूर्णा जांभुळपाडा तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५
मोबाईल नंबर ९१६८८०१०४८

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक सुनंदा सुरेश खाडे, दिनेश गणपत खोले, दीपेश गणपत खोले, यशवंती गणपत खोले, यशवंती राम दळवी, अर्चना महेंद्र खानेकर, माधवी महादेव खोले, योगेश महादेव खोले, किशोरी किशोर शिंदे, योगिता अभिजित शेळके, रंजिता रोहिदास खोले, रोहिदास खोले, शंकर रोहिदास खोले, शेखर रोहिदास खोले मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १६५ | १-१७-२० | १०-९२ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. ०८/०५/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट तुषार गणेश कानडे**
कार्यालय - कळंब रोड कॉर्नर, जवळ
हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक सुधीर रामचंद्र पांडव, सरीता रामचंद्र पांडव, द्रौपती बाळू मगर, सुलोचना शांताराम शिंदे, मालिनी यादव पानसरे, सरित रामचंद्र पांडव मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १६४ | ०-१७-४० | ०-३१ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. ०८/०५/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट तुषार गणेश कानडे**
कार्यालय कळंब रोड कॉर्नर, जवळ
हॉटेल अन्नपूर्णा जांभूळपाडा, तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्यांच्या मालकाकडून पूर्नविकसनाकरीता घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-मुद्रे खुर्द, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| गायत्री दर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित | ५/ब | ११ | ४७४ | १०.२२ |

सदरची बिनशेती मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती पूर्नविकसनाकरीता देण्याचा त्यांना पूर्ण हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील बिनशेती मिळकत ही तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना पूर्नविकसनाकरीता देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली बिनशेती मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल पूर्नविकसनाकरीता व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. ०८/०५/२०२६

**स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र
रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालक १) अजय अशोक जाधव २) विशाल शरद दाभणे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार ( रू.पै.) |
|---|---|---|---|
| ८३ | १ | ०-१७-३० | ०-६६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/०५/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
**प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,**
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक विलास गंगाराम खेरटकर, गर्जना नामदेव खेरटकर, वंदना नामदेव खेरटकर, मनिषा नरेंद्र खांडेकर, रोहिदास तात्या खेरटकर, सुनंदा तात्या खेरटकर, राणी राहुल ससाने, जिजाबाई केरु खेरटकर, राजेश्री राजेश खेरटकर, रीया राजेश खेरटकर, रुपाली राजेश खेरटकर, रोहन राजेश खेरटकर, वृषाली राजेश खेरटकर, शर्मिला सखाराम दंत, सोनाली नागेश परब, सागर सुरेश वाघमारे मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १६८ | ६-४४-२० | १८-६८ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. ०८/०५/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट तुषार गणेश कानडे**
कार्यालय-कळंब रोड कॉर्नर, जवळ
हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन-४१०२०५
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक हरिश्चंद्र मोरेश्वर घरत यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल, ता.अलिबाग | १५६७ | ०-४०-७० जिरायत<br>०-१६-७० बागायत<br>०-०६-८० पो.ख.<br>०-६४-२० एकुण | १०.३७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये हरिश्चंद्र मोरेश्वर घरत यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-३२-१० हे.आर., आकार ५ रू १९ पैसे जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०७/०५/२०२६

**ॲड. विराज शरद अंबुकर**
रा. थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९०२८८५१२८०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आगरकोट, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक राहुल किशोर परकर, कावेरी राहुल परकर, किशोर हरिश्चंद्र परकर आणि राहुल किशोर परकर सर्व रा. ४०१, नेहा ॲनेक्स, खोत रोड, भांडूप पश्चिम, मुंबई ४०० ००८ यांच्या नावे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबतचा तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आगरकोट ता.अलिबाग | ४/१ | १.४९.७०<br>पो.ख. ०.०९.६०<br>एकूण १.५९.३० | ९०.७५ |

वर नमुद मिळकतीपैकी राहुल किशोर परकर यांचे मालकीहक्कातील क्षेत्र ०.१०.२५ हे. आर., कावेरी राहुल परकर यांचे मालकीहक्कातील क्षेत्र ०.०५.२५ हे. आर. आणि किशोर हरिश्चंद्र परकर व राहुल किशोर परकर यांचे सामाईक मालकीहक्कातील क्षेत्र ०.०५.१० हे. आर. या बागायत मिळकती.

सबब सदर बागायत मिळकती निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा वा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांची वहिवाट, ताबा, कुळ, या नोटिशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरव्यांसह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष व रजिस्टर पोष्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक - ०६/०५/२०२६

सही /-
**ॲड.धिरज जयवंत म्हात्रे**
रा.दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक शरद पांडुरंग ढगे, शांताराम पांडुरंग ढगे, आत्माराम पांडुरंग ढगे, प्रणाली प्रवीण पोटफोडे मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ५३ | १-३५-५० | ११-३१ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. ०८/०५/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट, तुषार गणेश कानडे**
कार्यालय कळंब रोड कॉर्नर, जवळ
हॉटेल अन्नपूर्णा जांभूळपाडा, तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन -४१०२०५
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

## जाहीर नोटीस

दि. ०७/०५/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मांडला, ता. मुरुड, गट नं. ४१/१, क्षेत्र ०.५४.००, आकार १२.६० या सामाईक मिळकतीपैकी अफरोजा फैय्याज दळवी यांच्या नावे व मालकीची तसेच ताबेकब्जात असलेली मौजे मांडला, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्यांच्याकडून खरेदी करण्याचा आमच्या अशिलांचा मानस आहे. व त्यासंबंधी उभयतांत वाटाघाटी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मांडला | ४१/१ | ०-३०-०० | ६.७५ |
| पैकी क्षेत्र ०.१५.०० | | | |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र तरी, देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

मुरुड,
दि. ०७/०५/२०२६

**ॲड. प्रथमेश प्रकाश पोतदार**

**उपविभागीय अधिकारी, रोहा उपविभाग, रोहा यांच्या न्यायालयात**

जाहीर नोटीस

आरटीएस विलंबमाफी अर्ज क्र. २६/२०२६

१) श्री. दामु बारक्या जाधव
२) श्री. रावजी बारक्या जाधव
दोघेही रा. महागांव, पाली खोपोली रोड अपिलार्थी
ता. सुधागड, जि. रायगड- ४१०२०५

विरुद्ध

१) श्री. संतोष गणपत जाधव
२) श्री. संदिप गणपत जाधव
३) शारदा गणपत जाधव
४) मानसी मिलींद शिंदे
५) अनिता गणपत जाधव
अ. नं. १ ते ५ रा. गणपत जाधव चाळ,
प्रभाग समिती क्र. ३ जवळ, मंगळ भवन,
भद्रावती नगर, पद्मानगर, भिवंडी,
ठाणे, महाराष्ट्र - ४२१३०५
६) सुषमा गौतम जाधव
७) राज गौतम जाधव
८) रसिका गौतम जाधव उत्तरार्थी
९) मनिषा सुनिल जाधव
१०) स्वराज सुनिल जाधव तर्फे अ.पा.क
आई मनिषा सुनिल जाधव
११) अंजना प्रविण मोरे
१२) उषा धर्मा जाधव.
अ. नं. ६ ते १२ रा. गोवंडी गाव, प्रकाश पाटील चाळ,
मुंबई, महाराष्ट्र- ४०००८८
१३) सौ. जोत्स्ना प्रकाश देसाई.
रा. पाली, तालुका- सुधागड, जिल्हा रायगड,
महाराष्ट्र - ४१०२०५
१४) सौ. प्रतिभा मदनसिंग राजपुत,
रा.D/O मदनसिंग राजपुत, १० ए.एफ ब्लॉक,
पोलीस ऑफीसर कॉटर, तिन डोंगरी, गोरेगांव,
मुंबई, महाराष्ट्र- ४०००८२
१५) रोहीणी केतन दवणे,
रा. ए २५. १०५ हॅप्पी वेली, चितलेसर,
टीकुजीनी वाडी जवळ, माणपाड, ठाणे,
अपना बाजार जवळ, ठाणे - ४००६१०
१६) अस्मिता अशोक कांबळे
१७) लिला रविंद्र जाधव
१८) रोशन रविंद्र जाधव
१९) सोनी रविंद्र जाधव
अ. नं. १६ ते १९ रा. प्लॉट नं. २६/ओ/५
बैंगणवाडी, शिवाजी नगर, गोवंडी,
मुंबई- ४०००४३
२०) सिमा चिंतामण सोनावणे
२१) भगवान दामा सोनावणे उत्तरार्थी
२२) नारायण दामा सोनावणे
२३) चिंतामण दामा सोनावणे
२४) सुवर्णा चांगु कांबळे
२५) अपर्णा अनंत गायकवाड,
अ. नं. २० ते २५ रा. कवेळे, पो. भेरव,
ता. सुधागड, जि. रायगड

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते कि, अपिलार्थी यांनी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये दाखल मौजे ढोकशेत, ता. सुधागड येथील ग. नं. ६४, ६५ या मिळकतीबाबत फेरफार क्र. ८२६, १३३५, १३३९, १३९७, १४०७ व १५८२ च्या विरोधात अपिल दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक १८/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वतः अथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमुद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

दि. २८/०४/२०२६

सही/-
**उपविभागीय अधिकारी**
**रोहा विभाग रोहा**




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)

PNP MARITIME

WISHING

# Mr. Nrupal Jayant Patil

## HAPPY BIRTHDAY









WITH BEST COMPLIMENTS FROM

**PNP MARITIME SERVICES PVT.LTD.**

ADMIN. OFFICE :- 2ND FLOOR, LANSDOWNE HOUSE, MAHAKAVI BHUSHAN ROAD, COLABA, MUMBAI 400 001. TEL. +91-2288 4536/37/38/39/40 FAX : +91-2288 4535

REGD. OFFICE : A-5,IONIC, 18, ARTHUR BUNDER ROAD, COLABA, MUMBAI 400 005, INDIA.

PORT OFFICE : PNP PORT DHARAMTAR AT, SHAHABAJ, DIST. RAIGAD, TEL. : +91-2143-320766, WEBSITE : www.pnpport.com

Government of India Copyright 2018. Reproduced from Survey of India Tide Table for the port of Mumbai (Apollo Bunder) with the permission of Surveyor General of India

# कळंबोलीत चोरांचा सुळसुळाट

| कळंबोली | प्रतिनिधी |

कळंबोली नोडमध्ये गेल्या काही दिवसांपासून चोरांनी उच्छाद मांडला असून, चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. चोरट्यांनी आता शैक्षणिक संस्थांनाही लक्ष्य करण्यास सुरुवात केली असून, कळंबोली येथील नामांकित दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या एसीचे कॉपर पाईप पहाटे चोरून नेल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या बाहेर लावण्यात आलेल्या एसी युनिटचे महागडे कॉपर पाईप अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास कापून नेले. इन्स्टिट्यूट चालकाला सकाळी हा प्रकार निदर्शनास आला. यामुळे इन्स्टिट्यूटचे आर्थिक नुकसान झाले असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासातही व्यत्यय निर्माण झाला आहे.शिक्षण संस्था आणि व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



कळंबोली परिसरात अलीकडच्या काळात चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वीच एका हळदी समारंभात महिलेचे १८ तोळ्यांचे दागिने हिसकावण्याचा प्रयत्न झाल्याच्या घटना ताज्या असतानाच, आता एसी पाईप चोरीच्या प्रकारामुळे व्यापारी आणि रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तांब्याच्या वाढत्या किमतींमुळे चोरटे आता अशा सुट्या भागांकडे वळत असल्याचे दिसून येत आहे.

पोलिसांनी तातडीने या चोरांचा बंदोबस्त करावा आणि रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि व्यावसायिक करत आहेत.

# किल्ले रायगड महामार्ग नातेखिंडीत अडकला

## ■ सिंहस्तंभ वाचविण्याच्या नावाखाली कोणाच्या बांधकामाला अभय?

| महाड | उदय सावंत |

किल्ले रायगड एन एच १६६ एफ महामार्गाचे काम गेली पाच वर्ष सुरू असून मुंबई गोवा महामार्ग लगत करंजखोल गावाच्या हद्दीत नातेखिंडे या ठिकाणी या महामार्गाचे काम रखडले असून, नातेखिंडीत एका देवीचे मंदिर व महाड नगरपालिकेच्या पाणीपुरवठा पाईपलाईन यामुळे या कामाला विलंब होत आहे.



या ठिकाणी होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी गटार संरक्षण असणे गरजेचे असताना, तसेच या ठिकाणी सिंहस्तंभ हटवणे गरजेचे असताना या दोन्ही गोष्टी न करता कोणाच्या बांधकामाला संरक्षण दिले जात आहे, असा प्रश्न नागरिक व प्रवाशांना पडला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी किल्ले रायगडकडे महाडकडून जाणाऱ्या राज्य मार्गाला काही वर्षांपूर्वी महामार्गाचा दर्जा प्राप्त झाला. त्याच्या रुंदीकरण व काँक्रीटीकरणाच्या कामाला सुरूवात झाली आहे. मात्र हे काम गेली पाच वर्षापासून पूर्ण झालेले नाही. वाळसूर येथील पूल, लाडवली पूल आजही अपूर्ण अवस्थेत आहेत. तर या महामार्गावर अनेक ठिकाणी संरक्षण कठड्यांची कामेदेखील बाकी आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर ज्या ठिकाणी हा महामार्ग जोडला जातो. त्या करंजखोल गावात नातेखिंड या ठिकाणी या मार्गाचे काम गेले कित्येक वर्षे रखडले आहे. या ठिकाणी असलेली संकुचित खिंड फोडून रुंदीकरण करण्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र येथे असलेले एक छोटेसे मंदिर व महाड नगरपालिकेला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी असल्याकारणाने डोंगर फोडण्याचे कामदेखील थांबविण्यात आले आहे.

महामार्गावरून रायगडकडे जाताना या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक दुकाने, हॉटेल यांची संख्या वाढली असून अतिक्रमणदेखील वाढले आहे. महामार्गाच्या रुंदीकरणासाठी हे अतिक्रमण हटवणे अत्यंत गरजेचे आहे. या ठिकाणी असणारे म हामार्गाची रचना दुतर्फा गटार व मधला १२ मिटर रुंदीचा काँक्रीट रस्ता असा आराखडा असताना या परिपूर्ण आराखड्यानुसार जर या ठिकाणी महामार्ग बांधायचा असेल तर या ठिकाणी असणाऱ्या काही दुकानदार, हॉटेल व्यवसायिकांचे अतिक्रमण हटविणे गरजेचे आहे. तसेच दोन दशकांपूर्वी या ठिकाणी दोन सिंहस्तंभ उभारण्यात आले होते. हे सिंहस्तंभ कोणतेच ऐतिहासिक प्रतीक नसून त्याला कोणताही ऐतिहासिक किंवा आधुनिक असा संदर्भ नाही. तसेच या स्तंभाची मोठ्या प्रमाणावरती पडझड झाली आहे. अशावेळी रुंदी करण्याच्या आड येणारे हे दोन्ही स्तंभ या ठिकाणावरून हटवणे गरजेचे आहे. तशी मागणी महाड पत्रकार संघाचे वतीनेदेखील करण्यात आलेली आहे. मात्र हे दोन स्तंभ न हटवता या ठिकाणच्या महामार्गाच्या काँक्रीटीकरण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. अशावेळी हे स्तंभ न हटवण्यामागचे कारण आजही गुलदस्तात आहे. या मागे कोणाच्या बांधकामाला अभय दिले जात आहे? असा प्रश्न आता प्रवासी व नागरिक वर्गाला पडला आहे.

करंजखोल गावातील डोंगर परिसरातून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावरती पाणी या रायगड महामार्गावरती येते व नदीच्या स्वरूपात हे पाणी महामार्गावरून वाहक जाते. त्यामुळे या ठिकाणी वाहतुकीला मोठा अडसर निर्माण होतो. हे पावसाचे पाणी दुतर्फा होणाऱ्या गटारामधून वाहून गेल्यास याचा वाहतुकीला त्रास होणार नाही. मात्र या ठिकाणचे गटार बांधले गेले नाहीत तर मात्र हा प्रश्न गंभीर होऊ शकतो व भविष्यात अतिक्रमण रस्त्यावरती येऊ शकते व वाहतूक कोंडीचा प्रश्न देखील गंभीर होऊ शकतो.

अशीच काही व्यथा या मार्गावरील असंख्य वृक्षांची आहे. जुना महाड रायगड मार्ग हा दुतर्फा वृक्षांनी भरलेला होता. मोठमोठे डवलदार वृक्ष सावली देत होती. यामध्ये आंबा, चिंच, वड, पिंपळ यासारखे देखील वृक्ष होते. मात्र महामार्गाच्या रुंदीकरणावेळी हे सर्व वृक्ष तोडण्यात आले. या वृक्षांच्या बदल्यात या ठिकाणी काही रोपटी लावण्यात आली मात्र जोपासना होत नसल्याने व वेळेवरती पाणी मिळत नसल्याने तसेच वनव्यांमुळे ही रोपटी मरून गेलेली आहेत. त्यामुळे या ठिकाणी पुन्हा ते बहारदार वृक्ष होणे अवघड आहे. अशा या ऐतिहासिक मार्गाचे हरित सौंदर्य पूर्णपणे नष्ट झालेला आहे आणि आणि ते पुन्हा बहरने आता शक्य वाटत नाही. याला केवळ ठेकेदार आणि या महामार्ग विभागाचे अधिकारी जबाबदार आहेत.

# मुरुडमध्ये फार्मर कप स्पर्धा गट बांधणीसाठी सभा



| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुड तालुका कृषी विभाग, पाणी फाऊंडेशन आणि उमेद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने फार्मर कप स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. गट बांधणी करीता मुरुड तालुका पंचायत समितीतील श्री नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पाणी फाऊंडेशनचे अनिकेत जगदाळे, निकीता मोकल, तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे, सहाय्यक कृषी अधिकारी विशाल चौधरी, उमेद संस्थेकडून बी एम एम मॅडम, अनिल खापडे यांसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे यांनी गट बांधणीसाठी संपूर्ण मदत करू तसेच यापुढे सर्व योजना गटांसाठी प्रथम प्राधान्य राहील तसेच बियाणे सुद्धा प्रथम गटाला प्राधान्य असेल आणि गट शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादन नक्कीच वाढेल आणि मुरुड तालुक्यातील शेतीतील नैराश्य संपवण्यासाठी ही लोक चळवळ नक्कीच उपयोगी ठरेल, असे ते म्हणाले.

# टोरंट जलविद्युत प्रकल्पाचे काम बंद करावे

## शिवसेना उद्धव ठाकरे गटाची मागणी

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात पाली तर्फे कोतवाल खलाटी आणि साई डोंगर येथे टोरंट या खासगी कंपनीकडून जलविद्युत प्रकल्पाचे काम सुरू आहे.येथील शेतकऱ्यांनी प्रकल्प उभारण्यासाठी कोणतीही परवानगी दिलेली नाही आणि असे असताना आदिवासी लोकांच्या जमिनीमध्ये घुसून मातीपरीक्षण तसेच तेथे तंबू उभारून सुरू असलेली कामे तत्काळ थांबवावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वतीने करण्यात आली. टोरंट कंपनी व्यवस्थापन यांना याबाबत निवेदन देण्यात आले असून सुरू असलेली कामे थांबवली नाही तर जनआंदोलन उभे करण्याचा इशारा दिला आहे.



टोरंट एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून कर्जत तालुक्यात जलविद्युत प्रकल्प उभारणार आहे. हा प्रकल्प ज्या जमिनीवर होणार आहे. त्या जमिनीवर आदिवासी लोकांची पूर्वापार वस्ती आहे. येथील वन जमिनीमधील दळी भूखंड शासनाने वन हक्क कायद्याच्या अंतर्गत आदिवासी लोकांना कायमस्वरूपी दिले आहेत. त्यामुळे वन जमिनीचे दळी भूखंडाचे हे आदिवासी वहिवाटदार मूळ मालक बनले आहेत. त्याच जमिनीमध्ये म ाती परीक्षण,दगड परीक्षण अशी कामे टोरंट कंपनी कडून सुरू आहेत. त्या जमिनीमध्ये आदिवासी लोकांशिवाय आणि आदिवासी लोकांच्या संमती शिवाय काहीही होऊ शकत नाही. असे असताना टोरंट कंपनी आपला प्रकल्प पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहे. टोरंटकडून तेथे आदिवासी जमिनीमध्ये आदिवासी लोकांच्या कोणत्याही परवानगी विना सुरू असलेली कामे तत्काळ थांबवावीत यासाठी येथील आदिवासी लोकांनी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांना भेटून निवेदने दिले आहे.

त्यानंतर देखील टोरंट कडून आदिवासी लोकांच्या जमिनीमध्ये काढता पाय घेतला नाही.त्यामुळे आज शिवसेना ठाकरे पक्षाकडून टोरंट एनर्जी कंपनीला निवेदन देण्यात आले. त्यात आदिवासी जमिनीम ध्ये करण्यात आलेली बेकायदा घुसखोरी लक्षात घेता तत्काळ ती जागा सोडून बाहेर पडावे. तसेच तेथे ठेवण्यात आलेल्या मशिनरी तत्काळ उचलण्यात याव्यात अशी मागणी शिवसेना ठाकरे पक्षाचे वतीने करण्यात आली आहे.ही मागणी मान्य झाली नाही तर जनआंदोलन उभे करण्याचा इशारा ठाकरे पक्षाकडून देण्यात आला आहे.

# ‘परमात्म्याची संगत करा’

**खांब :** भगवान परमात्म्याची संगती करा जीवन यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही, असे, प्रतिपादन सुप्रसिद्ध किर्तनकार व समाजप्रबोधनकार भूषण पाटील यांनी काढले. रोहा तालुक्यातील धानकान्हे या गावचे सामाजिक कार्यकर्ते महादेव गोसावी व त्यांचे सुपुत्र संतोष गोसावी यांच्या नुतन वास्तूचे गृहप्रवेश व वास्तुशांती सम ारंभाप्रसंगी आपल्या हरिकिर्तनरूपी सेवेप्रसंगी उपस्थित भाविकांना संबोधित करताना ते बोलत होते. रायगड भूषण डॉ. मारूती कोलाटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या किर्तनरूपी सेवेप्रसंगी माजी सरपंच शांताराम महाडिक, अनिल सानप, कृष्णाराम धवनी, नथुराम जाधव, शंकर धनावडे, धोंडू कचरे, पांडुरंग गोसावी आदींसह म ोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.तर वास्तुशांतीनिमित्त खांब पंचक्रोशी व पाले बु.येथील भाविक भक्त यांची हरिपाठ सेवा संपन्न करण्यात आली.

# राष्ट्रीय ओबीसी बहुजन महासंघातर्फे राज्यस्तरीय अधिवेशन



| खरोशी | प्रतिनिधी|

राज्यातील ओबीसी शिक्षकांच्या हक्क, सन्मान आणि संघटनात्मक अस्तित्वासाठी झटणाऱ्या,कोकण विभागाचे माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या राज्यस्तरीय पहिल्या अधिवेशन व भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी संघटनेच्या पदाधिकारी यांनी मंत्रालयात भेट दिली..

ओबीसी शिक्षकांच्या प्रश्नांवर, त्यांच्या न्याय्य हक्कांवर, शैक्षणिक क्षेत्रातील उपेक्षेवर आणि राज्यात प्रथमच उभ्या राहत असलेल्या ओबीसी शिक्षकांच्या सशक्त संघटनात्मक चळवळीवर सविस्तर चर्चा केली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे, ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, ओबीसीचा बुलंद आवाज पडळकर यांना सदर निमंत्रण देण्यात आले. सर्व मंत्री महोदयांनी संघटनेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करून सांगितले की, राज्यात ओबीसी शिक्षकांसाठी काम करणारी पहिली शिक्षक संघटना उभी केली, हे अभिमानास्पद काम आहे. ओबीसी शिक्षक बांधवांच्या लढ्यात आम्ही कायम तुमच्या सोबत आहोत, असे आवर्जून सांगितले.



# प्रभावी नेतृत्व म्हणजेच नृपाल पाटील

**प्रमोद जाधव**

कमी वयात व्यावसायिक क्षेत्रात आपले नाव निर्माण करणारे व्यक्तिमत्व, शिस्तबध्द, हाती घेतलेले काम पूर्ण करणारे, आपल्या शांत, संयमी स्वभावाबरोबरच दुरदृष्टी असणारे प्रभावी नेतृत्व, राजकीय, सामाजिक, सहकारी व्यावसायिक क्षेत्रात एक वेगळी निर्माण करणारे, तरुणांचे आधारस्तंभ, नृपाल पाटील यांचा आज वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.

शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी सावकारीविरोधात लढणारे नेते स्व. नारायण नागू पाटील, त्यानंतर शेतकरी, कामगारांचे कैवारी स्व. प्रभाकर पाटील, रायगडसह कोकणातील बुलंद आवाज स्व. ॲड. दत्ता पाटील यांच्याकडून समाजसेवा, राजकारणाचे बालकडू घेऊन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी राज्याच्या राजकारणात एक वेगळा ठसा उमटला. जयंत पाटील यांच्या पत्नी सुप्रिया पाटील यांनीदेखील राजकारणासह समाजकारणात एक वेगळी ओळख निर्माण केली. रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी खंबीरपणे जबाबदारी सांभाळली आहे. तोच वारसा जपत जयंत पाटील आणि सुप्रिया पाटील यांचे सुपुत्र नृपाल पाटील यांनी सामाजिक, राजकीय व व्यावसायिक क्षेत्रात एक वेगळा उमटविला आहे. नृपाल पाटील हे पाटील घराण्याची चौथी पिढी आहे. धाडसी आणि मुत्सद्दी व्यक्तिमत्व असणारे नृपाल पाटील यांनी शांत आणि धीरोदत्तपणे वेगवेगळ्या क्षेत्रात काम करून स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न कायमच केला आहे. स्त्रीचे पुढे असणे हे केवळ भाषणामध्ये गोंडस वाक्य न ठरता त्यांनी त्यांची पत्नी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहेत. त्यांनी पुरुषसत्ताक विचारसरणीला चपराक लगावली, यात नृपाल पाटील यांचे मोठेपण दिसून येते. आपले एमबीएचे शिक्षण पुणे येथून पूर्ण झाल्यावर त्यांनी स्वतःला व्यवसायात झोकून दिले. १९९९ साली स्थापन झालेल्या पीएनपी मेरीटाईम या कंपनीतून मांडवा टू गेटवे ऑफ इंडिया ही बोटसेवा सुरू करण्यात आली. यामध्ये परदेशातील जलमार्ग प्रणाली, प्रवासी सुरक्षाव्यवस्था व आधुनिक व्यवस्थापन प्रणाली यांचा त्यांनी अभ्यास केला. अस्सल भारतीय बनावटीच्या बोट उभारणी करता त्यांनी २००१ साली त्यांनी सिस्प्रे ल्युमिनियम बोट्स या कंपनीची स्थापना केली. भारतीय नौदल, सागरी पोलीस दल यांना आवश्यक असणाऱ्या आणि कमी वेळात अधिक टिकाऊ आणि सक्षम प्रवास पूर्ण करणाऱ्या ॲल्युमिनियम आधारित बोट बांधणीचा प्रकल्प आणि कंपनी त्यांनी यशस्वीपणे पुढे नेली. पीएनपी बोट फेरी सेवेमुळे आज पर्यटन वाढीला चालना मिळाली आहे. गेटवे ते मांडवा बंदरापर्यंतचा जलप्रवास सुखाचा आणि आनंदमय ठरत आहे. आधुनिक पध्दतीने सुविधा असलेल्या पीएनपी बोटीतून प्रवास करण्यावर पर्यटकांसह स्थानिक भर देत आहेत. त्यामध्ये नृपाल पाटील यांचे योगदान मोलाचे ठरत आहे.

२००७-०८ च्या काळात अलिबाग आणि कोकण किनारपट्टी परिसरात वाढते यांत्रिकीकरण लक्षात घेता येथील औद्योगिक कारखान्यांना कच्चामाल सामुग्री आवश्यक होता, अशावेळी रस्ते वाहतूक हा एकच पर्याय रायगड जिल्ह्यात उपलब्ध होता. परंतु, जयंत पाटील यांनी नृपाल पाटील यांच्या सोबतीने खासगी बंदराची निर्मिती करण्याचा आणि त्यातून हजारो नागरिकांना रोजगार देण्याची संकल्पना मांडली. यातून मरीन फ्रंटीयरचा जन्म झाला. आज महाराष्ट्रातील अग्रमानांकित खासगी पोर्ट म्हणून पीएनपी पोर्टचा उल्लेख केला जातो. या पोर्टद्वारे करोडो रुपयांचा व्यवसाय जिल्ह्यातील अनेक कंपन्यांना उपलब्ध झाला आहे. त्यामुळे अनेक उद्योग, व्यवसाय जिल्ह्यात उभे राहिलेले पाहायला मिळत आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील आणि नृपाल पाटील यांची दूरदृष्टी आणि धोरणात्मक निर्णयामुळे हे शक्य झाले



आहे. त्यामुळे आज अनेकांचे आर्थिक जीवनमान सुधारलेले पाहायला मिळत आहे. त्यामध्ये बंदर व्यवस्था, रोजगारनिर्मिती व स्थानिक आर्थिक विकासाचे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरत आहे. यातूनच अलिबाग तालुक्यात औद्योगिकरणाचा नवा अध्याय सुरु झाला आहे.

राजकीय, व्यावसायिक क्षेत्रासह सहकार क्षेत्रातही नृपाल पाटील यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यात त्यांनी आधुनिकतेची जोड दिली आहे. हे त्यांच्या कर्तृत्वाने सिध्द करून दाखविले आहे. रायगड बाजारचे नेतृत्व त्यांच्याकडे आल्यानंतर बाजारपेठेतील स्पर्धा आणि सहकार उद्योग अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी वेगवेगळे बदल करण्याचा प्रयत्न केला. उत्कृष्ट इन्फ्रास्ट्रक्चर, कौशल्य आधारित कर्मचारी, संस्थेचे पारदर्शक कामकाज, संगणकीकरण याचा एकत्रितपणे पाठपुरावा त्यांनी केला आहे. रायगड बाजारला स्मार्ट रायगड बाजार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून ते अनेक वर्ष काम पहात आहेत. दूरदृष्टी आणि प्रबळ इच्छाशक्तीमुळे सहकार क्षेत्राच्या बळकटीत त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. कोकणचे भाग्यविधाते स्व. प्रभाकर पाटील यांच्या नावाने सुरु झालेल्या पीएनपी या संस्थेला एक वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम नृपाल पाटील यांनी सक्षमपणे केले आहे. आपल्या प्रभावी नेतृत्वाने त्यांनी अनेकवेळा दाखवून दिले आहे. त्यामुळे पीएनपी ही देशातील नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर एक वेगळी संस्था म्हणून नावारूपाला आली आहे. एक वेगळा ब्रँड तयार केला आहे. त्यामुळे अनेकांना रोजगार, उद्योग, व्यवसाय निर्माण करण्याची संधी मिळाली आहे. शांत, संयमी, मीतभाषी पण तितकाच व्यावहारिक दृष्टीकोन ठेवून चोखपणे काम करणारे नृपाल पाटील यांनी एक स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. पडद्यामागे राहून प्रभावीपणे काम करणारे नेतृत्व हे समाज परिवर्तनासाठी किती महत्त्वाचे असते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे नृपाल पाटील आहेत. आपल्या कर्तृत्वाची छाप त्यांनी त्यांच्या कार्यातून आणि कष्टातून सिध्द करून दाखविली आहे. संयमाच्या जोरावर त्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय बाळकडू अधिक नेटाने पुढे नेले आहे. नृपाल पाटील यांना वाढदिवसाच्या असंख्य शुभेच्छा...

# पाणी समस्येमुळे माथेरानकर आक्रमक

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

पर्यटन हंगाम आलेला असताना अद्यापही माथेरान वासीयांना पाण्याच्या जटील समस्येला तोंड द्यावे लागत असल्याने माथेरानकर आक्रमक झालेले दिसत आहेत. दरम्यान, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांसह विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, नगरसेवक सचिन दाभेकर, किरण पेमारे, वसंत कदम, सीताराम शिंदे, सागर जोशी, अतिष ढेबे यांनी थेट जल शुद्धीकरण केंद्रावर जाऊन धडक दिली.



नेरळ उल्हास नदीतून पाण्याचा उपसा केला जात आहे. या ठिकणी एकूण ३ पंप बसविण्यात आले असून, नदीतनू २४ तास पाणी काढले जात आहे. जुम्मापट्टी येथे १६ तास पंपिंग होत असतानाही इथे फक्त दहा तास का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मागील दोन दिवस माथेरानमध्ये फक्त ८ तास पंपिंग केली आहे. माथेरान लेकची पंपिंग बंद असून ३२ फूट पाणीसाठा शिल्लक असून या तलावाची तीन ते चार वर्षे स्वच्छता न केल्यामुळे १५ फूट गाळ साचला आहे. फिल्टर हाऊसला सफेद रेती संपल्याने पाणी फिल्टर प्रक्रियेवरती त्याचा परिणाम होत असून नागरिकांना दुषित पाणी मिळत आहे. त्यातच नेरळहुन पाण्याचा उपसा होताना वाटेत अनेक ठिकाणी अनधिकृतपणे जोडण्या केलेल्या दिसत आहेत.

एकीकडे ग्रामस्थांनी पाण्याची बिले अदा करायची आणि दुसरीकडे पाण्याची चोरी सुध्दा केली जात असल्याचे दिसून येत आहे. याकडे जीवन प्राधिकरण अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याचे नागरिक बोलत आहेत. २०२१ ते २०२५ या वर्षापर्यंत पंधरा तास पंपिंग केली जात होती ती सध्याच्या घडीला सहा ते सात तास पंपिंग होत असते. एका तासाला जेमतेम नव्वद हजार लिटर पाणी येत असून संपूर्ण माथेरानमध्ये आजच्या परिस्थितीत अठरा लाख लिटर पाण्याची गरज असते.

पाण्याचे पंप सुध्दा नादुरुस्त असतात अशावेळी येथील शारलोट लेकमधून पाण्याचा उपसा केला जात असतो. या लेकची पातळी खालावल्याने गाळ वजा करता वीस फूट पाण्याची पातळी शिल्लक आहे. यामुळे गावातील विविध ठिकाणी हप्त्यातून एक दिवस पाणी कपात केली जात आहे.

## सहा लाख पन्नास हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** पैसे गुंतवणूक करण्यास भाग पाडून जास्त नफा मिळवून देतो असे सांगून ३७ वर्षीय महिलेची सहा लाख पन्नास हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विनीत भरत परवडकर (रा. वापी गुजरात) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात पाच मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

ज्योती प्रदीप हंकारे या सेक्टर १३, खारघर येथे राहत असून आठ मे २०२५ ते आजपर्यंत आरोपी विनीत याने त्यांना पैसे गुंतवणूक करण्यास भाग पाडले आणि जास्त नफा मिळवून देतो असे सांगितले. त्यांच्याकडून त्याने सहा लाख ५० हजार रुपये घेतले आणि नफा दिला नाही आणि दिलेले पैसे परत केले नाहीत.

## गोहत्या बंदीचा कठोर कायदा करावा –दिनेश पाटील


**। रसायनी । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय संत परिषदेच्या वतीने आंतरराष्ट्रीय हिंदू धर्म रक्षक पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात व भव्यतेने संपन्न झाला. याप्रसंगी हिंदुत्व रक्षण, संतसेवा व गोसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल हिंदू धर्मभूषण, संत परिषद महाराष्ट्र राज्यमंत्री नंदकिशोर वायाळ पाटील यांना आंतरराष्ट्रीय हिंदू धर्म रक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



यावेळी दिनेश पाटील यांनी आपल्या ओजस्वी भाषणात सरकारला थेट धारेवर धरत म्हटले, ज्या गो-मातेच्या नावावर मते मागितली, ज्या हिंदुत्वाच्या नावावर सरकार स्थापन झाले, त्याच सरकारच्या काळात आज भारत गो-मांस निर्यातीत जगात दुसऱ्या क्रमांकावर कसा पोहोचला? हा कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा घोर अपमान व विश्वासघात आहे. त्यांनी केंद्र सरकारकडे तातडीने मागणी करत म्हटले. गो-मातेला राष्ट्रीय माता व संपूर्ण गोवंशाला राष्ट्रीय वारसा म्हणून घोषित करावे. गोहत्येवर संपूर्ण बंदी घालण्यासाठी कठोर केंद्रीय कायदा तात्काळ करावा. जोपर्यंत सरकार हे करत नाही, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय बजरंग दल रस्त्यावर संघर्ष करत राहील.

दिनेश पाटील पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, संत तुकाराम-ज्ञानेश्वर माऊलींची भक्ती परंपरा हीच हिंदुस्थानची खरी ओळख आहे. आता प्रत्येक हिंदूने जागृत होण्याची वेळ आली आहे. लव्ह जिहाद व धर्मांतराच्या विरोधात घराघरातून आवाज उठला पाहिजे. जो हिंदू हिताची बात करेल, तोच या देशावर राज्य करेल, असे दिनेश पाटील म्हणाले.



## सुभाष पाटील यांची परीक्षक म्हणून नियुक्ती

**चिरनेर :** तायक्कॉन्डो फेडरेशन ऑफ इंडिया व तायक्कॉन्डो असोसिएशन ऑफ उत्तराखंड या अधिकृत संघटने मार्फत इनडोअर स्टेडियम विदिशा मध्य प्रदेश येथे ८ ते १० मे २०२६ राष्ट्रीय पंच सेमिनार व राष्ट्रीय पंच परीक्षा होणार आहे. या होणाऱ्या तायक्कांदो परीक्षासाठी परीक्षक म्हणुन रायगडचे सुपूत्र तायक्कांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्कांदो रेफरी युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची निवड झाली आहे. सुभाष पाटील हे ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये पंच म्हणुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांनी अनेक देशात जाऊन सेनिनार केले आहेत. ते प्रथम श्रेणीचे आंतरराष्ट्रीय पंच आहेत आंतरराष्ट्रीय ज्युनियर तायक्कांदो स्पर्धा दक्षिण कोरिया २००४ भारतीय संघाचे कोच, पंच पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा २०१० भारत, पंच कॉमनवेल्थ स्पर्धा २०११ आंतरराष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धा दक्षिण कोरिया २०११ भारतीय संघाचे कोच, पंच ११ वी इजराइल ओपन तायक्कांदो स्पर्धा २०१३ पंच ८ वी स्कॉटिश ओपन स्पर्धा २०१३ स्कॉटलंड, संघप्रमख कोरिया ओपन २०१४, आरतराष्ट्रीय साफ गेम २०१६, लुसोफोतीया तायक्कांदो स्पर्धा नियंत्रक २०१४ गोवा, कॅनडा ओपन व पैरा ओपन तायक्कांदो चॅम्पियनशिप २०१७ पंच २०२३ वर्ल्ड तायक्कांदो प्रेसिडंट कप व ओशियाना पॅरा व ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धा तसेच आतापर्यंत अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होऊन सुभाष पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. गोवा नॅशनल गेम २०२३ व नॅशनल गेम उत्तराखंड २०२५ स्पर्धेसाठी सुभाष पाटील यांची पंच प्रमुख म्हणून निवड करण्यात आली होती. ते ७ मे २०२६ रोजी विदेशा मध्य प्रदेश येथे रवाना होणार आहेत.

## प्लेऑफचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली :** आयपीएल प्लेऑफचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. स्पर्धेची सुरुवात २६ मे रोजी क्वालिफायर १ ने होईल. अंतिम सामना ३१ मे रोजी अहमदाबाद येथे खेळला जाईल.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने मंगळवारी प्लेऑफचा तपशील जाहीर केला. ५ मे पर्यंत आयपीएल २०२६ मध्ये ४८ सामने खेळले गेले आहेत. ७० सामन्यांनंतर प्लेऑफ खेळले जातील.धर्मशाला येथे पहिला क्वालिफायर, तर चंदीगड येथे दोन सामने आयोजित केले जातील. आयपीएल २०२६ चा पहिला प्लेऑफ सामना, क्वालिफायर १, २६ मे रोजी धर्मशाला येथील एचपीसीए स्टेडियमवर खेळला जाईल. यामध्ये गुणतालिकेतील अव्वल दोन संघ एकमेकांविरुद्ध खेळतील. त्यानंतर ही स्पर्धा चंदीगड येथील न्यू इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर खेळवली जाईल. तिथे २७ मे रोजी एलिमिनेटर आणि २९ मे रोजी क्वालिफायर २ खेळला जाईल.या हंगामाचा महाअंतिम सामना ३१ मे रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाईल. सलग दुसऱ्या वर्षी मोदी स्टेडियमवर हा विजेतेपदाचा सामना आयोजित केला जाईल. आयपीएल २०२५ चा अंतिम सामनाही येथेच खेळला गेला होता, ज्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूर (आरसीबी) संघाने पंजाब किंग्सला हरवून ट्रॉफी जिंकली होती. पंजाब किंग्स गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे. आयपीएल २०२६ मध्ये एकूण ७४ सामने होणार असून, त्यात ७० लीग सामन्यांचा समावेश आहे. २८ मार्च २०२६ रोजी सुरू झालेल्या या स्पर्धेत आतापर्यंत ४८ सामने खेळले गेले असून, प्लेऑफसाठीची शर्यत रोमांचक झाली आहे. पंजाब किंग्स (पीबीकेएस) सध्या १३ गुणांसह गुणतालिकेत आघाडीवर आहे, तर लखनौ सुपर जायंट्स (एलएसजी) तळाशी आहे.




# सनरायझर्स हैदराबादचा विजय

## ■ प्ले ऑफच्या शर्यतीत मोठी उलथापालथ ■ कूपर कॉनलीचे खणखणीत शतक ठरले व्यर्थ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२२०+ धावा उभारल्यानंतर विजय पक्का, हे समीकरण सनरायझर्स हैदराबादने कायम राखले. इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मध्ये पंजाब किंग्सचा पराभव करून सनरायझर्सने गुणतालिकेत १४ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. पंजाबची मक्तेदारी मंगळवारी संपुष्टात आली आणि आता प्ले ऑफची शर्यत अधिक रंगतदार झाली आहे. हैदराबादने आज तिन्ही आघाड्यांवर वर्चस्व गाजवले, तेच पंजाबला ३ झेल सोडणे महागात पडले. आता प्ले ऑफची शर्यत आणखी चुरशीची झाली आहे. कूपर कॉनलीने खणखणीत शतक झळकावले, परंतु पंजाबला विजय मिळवून देण्यासाठी त्याची एकट्याची झुंज कामी नाही आली.




पंजाबच्या गचाळ क्षेत्ररक्षणाचा फायदा हैदराबादच्या फलंदाजांनी पुरेपूर उचलला. तीन सोपे झेल व एक स्टम्पिंग गमावल्याचा पंजाबला संपूर्ण सामन्यात पश्चाताप झाला. अभिषेक शर्माने १३ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ३५ धावांची आक्रमक खेळी केली आणि त्याला ट्रॅव्हिस हेड ( १९ चेंडूंत ३८ धावा) याची साथ मिळाली. दोन्ही सलामीवीर माघारी परतल्यानंतर पंजाबला डोकं वर काढण्याची संधी होती, परंतु शशांक सिंग, कूपर कॉनली व ल्युकी फर्ग्युसन यांनी सोपे झेल टाकले. मिळालेल्या संधीचं सोनं करताना इशानने ३२ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ५५ धावा केल्या. इशान व हेनरिच क्लासन यांनी ४८ चेंडूंत ८८ धावांची भागीदारी केली.

क्लासनने मोर्चा सांभाळताना ४३ चेंडूंत ३ चौकार व ४ षटकारांसह ६९ धावा केल्या, त्याच्यासोबत नितीश कुमार रेड्डीने ३२ चेंडूंत ६३ धावा जोडल्या. नितीश १३ चेंडूंत २ चौकार व २ षटकारांसह २९ धावांवर नाबाद राहिला आणि हैदराबाद ४ बाद २३५ धावांपर्यंत पोहोचला. पंजाबने या पर्वात पाच सामने लक्ष्याचा पाठलाग करताना जिंकले असले तरी हैदराबादने १० वेळा २२० हून अधिक धावा केल्या आणि त्यांना एकही हार पत्करावी लागली नाही. आजच्या डावात हैद्राबानने मारलेले १७ षटकार ही देखील विरुद्ध त्यांची सर्वाधिक संख्या आहे..

पंजाबची सुरुवात काही खास झाली नाही आणि प्रियांश आर्य (१) व प्रभसिमरन सिंग (३) हे दोन्ही सलामीवीर अनुक्रमे इशान मलिंगा व पॅट कमिन्सच्या गोलंदाजीवर बाद झाले. हैदराबादच्या क्षेत्ररक्षकांनी सुरेख झेल टिपले. श्रेयस अय्यरही (५) स्वस्तात माघारी परतल्यानं पंजाबची अवस्था ३ बाद २३ अशी झालेली. मार्कस स्टॉयनिस व कूपर कॉनली यांनी ४० धावांची भागीदारी करून पंजाबचा डाव सावरला होता. पण, शिवांग कुमारने ही जोडी तोडली. स्टॉयनिस १४ चेंडूंत २८ धावांवर बाद झाला. पंजाबला १० षटकांत ४ बाद ९१ धावा करता आल्या होत्या आणि त्यांना ६० चेंडूंत १४५ धावा करायच्या होत्या.

सूर्यांश शेडगेला (२५) आज मोठी खेळी करून मैदान गाजवण्याची संधी होती, परंतु पॅट कमिन्सच्या अनुभवासमोर तो अपयशी ठरला. आखुड चेंडूवर पुल शॉट मारण्याच्या प्रयत्नात तो झेलबाद झाला. पंजाबचे विकेटसत्र कायम राहिले आणि शशांक सिंग (४) अपयशी ठरला. कूपर कॉनली एकटा खिंड लढवताना दिसला आणि त्याने अर्धशतकही पूर्ण केले, परंतु पंजाबच्या विजयासाठी त्याची झुंज पुरेशी नव्हती. हैदराबादने ३३ धावांनी विजय मिळवताना पंजाबला ७ बाद २०२ धावांवर रोखले. कॉनली ५९ चेंडूंत ७ चौकार व ८ षटकारांसह १०७ धावांवर नाबाद राहिला.

सनरायझर्स हैदराबाद गुणतालिकेत १४ गुणांसह अव्वल स्थानी आला आहे आणि पंजाब १३ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. पंजाबची गाडी घसरत चालली आहे आणि हा त्यांचा सलग तिसरा पराभव आहे. त्यामुळे त्यांचा असाच खेळ शिल्लक राहिला, तर अन्य संघांना संधी मिळू शकते. आरसीबी व राजस्थान रॉयल हे संघ प्रत्येकी १२ गुणांसह अव्वल चारमध्ये आहेत. गुजरात टायटन्स ( १२) व चेन्नई सुपर किंग्स (१०) हेही अजून शर्यतीत आहेत. त्यामुळे अव्वल चारमधील संघांची चुक इतरांसाठी निर्णायक ठरू शकते.

# खाशाबा चित्रपट पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

## ■ स्थगितीबाबत नागराज मंजुळेंसह जिओला नोटीस

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

न्यायालयात दावा सुरू असतानाही खाशाबा चित्रपटाचा ट्रेलर प्रर्दशित केल्याने चित्रपट स्थगितीच्या सुनावणीसाठी दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्यासह निर्मात्या ज्योती देशपांडे, जिओ स्टुडियो, आटपाट प्रोडक्शनला पुणे सत्र न्यायालयाने नोटीस बजावली आहे.

डिसेंबर २०२४ पासून दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी घोषित केलेल्या खाशाबा जाधव यांच्या चित्रपटातील कथा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मूळ कथा लेखक संजय दुधाणे यांनी कॉपीराईटबाबत पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात दावा सुरू आहे.

खाशाबा जाधव यांच्या चरित्र पुस्तकाचे हक्क २००१ पासून संजय दुधाणे यांच्याकडे असून भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयाचे प्रमाणपत्रही त्यांच्याकडे आहे. या पुस्तकाच्या कॉपीराईटचा खाशाबा चित्रपटाचा दावा सुरू असतानाच १ मे पासून चित्रपटगृहात खाशाबांचा ट्रेलर प्रर्दशित करण्यात येत आहे. याचा दाखला देत चित्रपट प्रदर्शन करण्यास स्थगितीसाठी ॲड. रवद्र शदे व ॲड. सुवर्णा शदे यांनी पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात २ मे रोजी अर्ज दाखल केला. न्यायालयाने अर्जाची तातडीने दखल घेत ८ मे रोजी तातडीच्या सुनावणीसाठी नागराज मंजुळे यांच्यासह ज्योती देशपांडे यांना नोटिसा पाठवल्या आहेत.

लेखक दुधाणे म्हणाले की, जिओ स्टुडिओ आणि ज्योती देशपांडे यांना आमचा विरोध नाही. मात्र मंजुळे यांनी माझ्यावर केलेल्या ५ कोटीच्या अब्रुनुसान दाव्यातूनच चित्रपट माझ्या पुस्तकावर आधारित असल्याचे सिध्द होते. प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने अधिक भाष्य मला करता येत नाही.




### मंजुळेंचे शपथपत्र; कथा दुधाणे यांचीच

चित्रपट दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी लेखक संजय दुधाणे यांच्यावर ५ कोटीचा अब्रुनुकसान दावा दाखल केला असून या दाव्यातील शपथपत्रातच कथा ही दुधाणे यांच्या पुस्तकावर आधारित असल्याचे पुरावे मंजुळे यांनी जोडले आहेत. मंजुळे यांच्या दाव्यातच खाशाबा चित्रपट हा सोशल मिडियाच्या माहिती आधारे चित्रपट निर्माण करीत असल्याचे मंजुळे यांनी शपथपत्र दिले आहे.

# फ्रेंच ओपनवर बहिष्काराचा इशारा

**। रोम । वृत्तसंस्था ।**

महिला वर्ल्ड नंबर-१ आर्यना सबालेंका यांनी मंगळवारी सांगितले की, जर फ्रेंच ओपनमधील बक्षीस रक्कम वाढवली नाही तर खेळाडू स्पर्धेवर बहिष्कार टाकू शकतात.



अमेरिकन स्टार कोको गॉफ यांनीही याला पाठिंबा दिला. पुरुष गटातील नंबर-१ खेळाडू जॅनिक सिनर आणि टॉप-१० मधील इतर अनेक खेळाडूंनीही बक्षीस रकमेबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. या वर्षी फ्रेंच ओपनची बक्षीस रक्कम ९.५ टक्केने वाढून ६१.७ दशलक्ष युरो झाली आहे, पण खेळाडू ती कमी मानतात.खेळाडूंनी सोमवारी दावा केला की, स्पर्धेच्या उत्पन्नातील त्यांचा वाटा २०२४ च्या १५.५ टक्के वरून २०२६ पर्यंत १४.९ टक्के पर्यंत कमी होऊ शकतो. खेळाडूंना उत्पन्नात २२ टक्के वाटा हवा आहे. खेळाडू केवळ बक्षीस रकमेचीच नाही, तर चारही ग्रँड स्लॅम ऑस्ट्रेलियन ओपन, फ्रेंच ओपन, विम्बल्डन चॅम्पियनशिप आणि यूएस ओपनमधून चांगले प्रतिनिधित्व, आरोग्य सुविधा आणि पेन्शनचीही मागणी करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की ग्रँड स्लॅम स्पर्धा कोट्यवधींचा नफा कमावतात, परंतु खेळाडूंना त्यांच्या श्रमाच्या प्रमाणात लाभ मिळत नाही.

